# प्रकरण चार

## महिला व बालकल्याण विभाग

**4.449 अंगणवाडीसाठी विविध प्रकारची खेळणी खरेदी.**

**पंचायत समिती पेण, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** पंचायत समिती पेण अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाने, सन 2015-2016 या वित्तीय वर्षात खेळणी खरेदी करण्यासाठी रुपये 1,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी पंचायत समिती सेस 10 टक्के महिला बालकल्याण योजनेअंतर्गत अंगणवाडीतील मुलांना खेळण्यासाठी खेळणी खरेदीची नस्ती तपासली असता नस्तीवर कोणत्या तारखेला नस्ती सादर केली तो दिनांक नमूद नाही.

2) खेळणी खरेदी करण्यापूर्वी अंगणवाडयांकडून मागणी घेतलेली नाही.

3) सदर खरेदी दरपत्रके मागवून करण्यात आलेली आहे.

4) दरपत्रके कार्यालयात प्राप्त झाल्याचे कार्यालयाचा आवक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

5) बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी खर्चाला दिलेल्या मंजूरी आदेशावर कार्यालयीन जावक क्रमांक नमूद नाही.

6) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील प्रकरण क्रमांक 5 मधील परिच्छेद 5.12 व 5.14 अन्वये कारागृह विभागाकडे व अंध व अपंग यांच्या संस्थांकडे मागणी नोंदविणे आवश्यक होते कारण सदर वस्तु त्या संस्थेकडे व विभागाकडे आरक्षित आहे, असे असून देखील संबंधितांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सबब सदर शासन निर्णयाचे उल्लंघन करुन केलेली खरेदी नियमबाहय ठरते.

**4.450 शेवया मशिन वाटपा मधील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पोलादपूर, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** महिला बालकल्याण विभाग रा. जि. प. अलिबाग यांचे पत्र क्रमांक 520 दिनांक 30/03/2016 अन्वये एकूण 17 प्रकल्पांना 55 महिलांना प्रति नग 19980.00 प्रमाणे पोलादपूर तालुक्यासाठी 6 नग शेवया मशिन पुरवठा केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008 प्र.क्र.446/ वित्त-1, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चित केलेले असून त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ओपीआर 1088/सीआर 786, दिनांक 26/10/1989 नुसार खरेदी केलेले साहित्य त्याच वर्षात वाटप होणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पत्र क्रमांक पंरास 1084/सीआर/1633/578, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा वसूल केल्याशिवाय लाभ देवू नये अथवा वस्तूंची खरेदी करु नये असे असताना 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसूल केलेला नाही.

4) खरेदी साहित्य पुरवठा आदेश क्रमांक 2 नुसार स्पेसिफीकेशननुसार असल्याची खात्री करता आली नाही.

5) पुरवठा आदेश क्रमाक 520, दिनांक 30/03/2016 रोजी देवून दिनांक 31/03/2016 पूर्वी पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत.

6) प्राप्त साहित्य वाटप न करता तसेच पडून राहिले आहे.

7) लाभार्थी निवड नस्ती तपासणी केली असता त्यामध्ये कुटुंब मर्यादित असलेबाबत तसेच त्यांचे कुटूंबातील व्यक्ती शासकीय सेवेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र आढळून आले नाही.

8) साहित्य प्रत्यक्षात प्राप्त दिनांक 18/03/2016 असून पुरवठा आदेशापूर्वी कसे प्राप्त झाले आहे. याचा खुलासा प्राप्त झालेला नाही.

**4.451 5 वी ते 12 वी च्या मुलींना सायकल वाटप करणे. (90 टक्के अनुदानावर)**

**पंचायत समिती रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,10,850/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने दिनांक 20/05/2015 च्या सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 375 व सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 523, दिनांक 29/02/2016 नुसार रुपये 2,50,000/- व रुपये 1,65,000/- अशी रुपये 4,15,000/- तरतूद करुन मुलींना लेडीज सायकल खरेदी करण्याबाबत मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार खरेदीबाबत ई-निविदा प्रसिध्दी पंसर/साप्रवि/ग्रा.पं./मबाक/घरघंटी/2015, दिनांक 16/10/2015 अन्वये निविदा प्रसिध्दी केली आहे. त्यामध्ये फक्त आय.एस.आय ट्रेडमार्क लेडीज सायकल एवढाच उल्लेख केला आहे. त्यामध्ये सायकल बरोबर येणारे साहित्य टिपणीत नमूद केल्याप्रमाणे उल्लेख नाही.

2) प्राप्त तीन ही पुरवठादारांनी कोहीनूर लेडीज सायकलचा पुरवठा व दर नमूद केला आहे.

3) प्रथम खरेदी 61 नग सायकलची नोंद साठा पान नोंदवही नमुना 33 मधील पान 10 वर दिनांक 21/11/2015 रोजी 56 सायकल वाटप असून लेखापरिक्षण तारखे अखेर 5 सायकल शिल्लक आहेत.

4) दुस-या खरेदीमध्ये 40 सायकली खरेदी असून सायकल साठा पान क्रमांक 65 वर नोंद असून लेखापरिक्षण तारखे अखेर वाटप निरंक आहे. एकूण 45 सायकल वाटप बाकी आहेत. म्हणजेच 45*4050 = रूपये1,82,250/- एवढी रक्कम नाहक गुंतवून पडलेली आहे.

5) पुरवठा आदेश दोन नुसार 40 सायकल खरेदी बाबत पुरवठा आदेशावर जावक क्रमांक, दिनांक नमूद नाही. तसेच खरेदी पावतीवर खरेदी दिनांक नमूद नाही. त्यामुळे सायकल केव्हा प्राप्त झाल्याची पडताळणी करता आली नाही.

6) प्रथम वाटप यादी मधील 56 सायकल वाटप असून 54 प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले आहेत. त्यावर गट विकास अधिकारी, सभापती यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. सानिया नवनाथ शिवलकर व श्रावणी नितीन शिवलकर यांना सायकल वाटप केल्या असून त्यांचे प्रस्ताव व गावाची नावे उपलब्ध नाहीत.

**4.452 10 टक्के महिला व बालकल्याण विभागांतर्गत योजना राबविणे बाबत.**

**पंचायत समिती दापोली, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती दापोलीचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडील लेख्यांची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवायच्या योजनांबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या 10 टक्के रक्कम ही, प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी समितीच्या एकूण निधीपैकी 50 टक्के आणि वस्तू खरेदीच्या योजनांसाठी 50 टक्के निधी खर्च करणेबाबत सूचना असतांनाही तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना 10 टक्के पंचायत समिती सेस अंतर्गत रक्कम रुपये 22,88,000/- एवढे अनुदान वितरित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने 3 टक्के अपंगासाठी रक्कम रुपये 68,640/- प्रशिक्षण व सक्षमिकरणाच्या योजना राबविण्यासाठी रक्कम रुपये 11,09,680/- व वस्तू खरेदीच्या योजनेसाठी रक्कम रुपये 11,09,680/- अशाप्रकारे रक्कम खर्च करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) उपरोक्त प्रमाणे अनुदान उपलब्ध असतांना एकात्मिक बाल विकास विभागाने उपरोक्त शासन निर्णयानुसार रक्कम खर्च न करता प्रशिक्षण व सक्षमिकरणासाठी रक्कम रुपये 7,74,000/- एवढी रक्कम खर्च

केल्याने रक्कम रुपये 3,35,680/- कमी खर्च केलेला असून वस्तू खरेदीच्या योजनेसाठी रक्कम रुपये 14,45,360/- एवढा खर्च केल्याने रक्कम रुपये 3,35,680/- जादा खर्च केलेला आहे. तसेच 3 टक्के अपंग महिला व बालकांसाठी रक्कम रुपये 68,640/- अखर्चित ठेवल्याने लाभार्थी योजनेपासून वंचित राहिलेले आहेत.

**4.453 महिला व मुलींना देण्यात आलेल्या तांत्रिक प्रशिक्षण खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 32, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,48,800/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रती लाभार्थी 3,100/- रुपये प्रमाणे एकूण 48 लाभार्थींना लाभ दिला असून, लाभार्थींनी ओम शिवशक्ती शिक्षण संस्था संचालित भारतरत्न महर्षी कर्वे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, गुहागर यांचेकडे प्रशिक्षण घेतले असून, या संस्थेकडील लाभार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केलेबाबतची प्रमाणपत्रे लेखापरिक्षण तपासणीस प्राप्त झाली नाहीत. त्यामुळे झालेला खर्च योग्य असलेबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

**4.454 10 टक्के महिला व बालकल्याण विभागांतर्गत योजना राबविणे बाबत.**

**पंचायत समिती मंडणगड, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती मंडणगडचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी एकात्मिक बालविकास सेवायोजना यांच्याकडील लेख्यांची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवावयच्या योजनांबाबत मार्गदर्शक सूचना असतानाही योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य कार्यवाही करण्यात आलेली नाही.

गटविकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक पसंम/सा/सेस/440/15, दिनांक 28/01/2016 अन्वये बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना 10 टक्के पंचायत समिती सेस अंतर्गत रक्कम रुपये 3,76,309/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने पंचायत समितीच्या दिनांक 10/02/2016 रोजीच्या ठरावाने 3 टक्के अपंगासाठी रक्कम रुपये 11,289/- तांत्रिक व्यवसाय प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये 73,004/- किशोरवयीन मुलींना जनरल प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये 74,506/-, अंगणवाडी सेविका मदतनीस प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये 35,000/- व साहित्य खरेदी (घरघंटी) साठी रक्कम रुपये 1,82,510/- अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे अनुदान उपलब्ध असताना व तरतूद असतानाही एकात्मिक बालविकास विभागाने उपरोक्त शासन निर्णयानुसार रक्कम खर्च न करता प्रशिक्षण व सक्षमिकरणासाठी रक्कम रुपये 1,69,455/- एवढी रक्कम खर्च केल्याने 3 टक्के अपंग व वस्तू खरेदीची रक्कम रुपये 2,06,854/- अखर्चित ठेवल्याने लाभार्थी योजने पासून वंचित राहिलेले आहेत.

**4.455 ग्रामीण भागातील 5 वी ते 12 वी वर्गातील मुलींना सायकल पुरविणे.**

**पंचायत समिती राजापूर, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 52, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,46,501/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेडीज सायकल खरेदी करण्यापूर्वी लाभार्थी यांचे प्रस्ताव मागणी करुन लाभार्थी यादी मंजूर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करताच सायकल खरेदी करुन नंतर प्रस्ताव मागणी करण्यात आले आहेत.

2) लाभार्थी प्रस्तावांपैकी लेखापरिक्षणासाठी 20 प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले असून साठा रजिस्टर नमुना नंबर 33 उपलब्ध नाही. वाटप 20 सायकल असून 41 सायकल शिल्लक आहेत. त्यामुळे पंचायत समितीची

रुपये 1,65,681/- एवढी रक्कम नाहक गुंतवून पडलेली आहे. सायकल मागणी नसतांना खरेदी करण्याचे प्रयोजन काय ?

3) लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ त्याच वित्तीय वर्षात देय असतांना लाभार्थींचे प्रस्तावावरुन जून 2016 नंतरचे कागदपत्रे जमा करुन प्रस्तावानुसार सन 2016-2017 या वर्षात लाभ देण्यात आल्याचे दिसते.

4) धनश्री दिपक पाटोळे, रा.जांभवली इयत्ता 10 वी सद्‌गुरु गगनगिरी विद्यालय, तुळसवडे यांच्या दारिद्रय रेषेखालील दाखल्यावर ग्रामसेवक यांची स्वाक्षरी नाही. तसेच, रेशनकार्ड जाधव वामन शांताराम दारिद्रय रेषा क्रमांक 21 असून यशवंत तुकाराम पाटोळे यांची पुतणी म्हणून दाखला दिला आहे. तसेच, जाधव वामन शांताराम यांचे रेशनकार्डवर अनुक्रमांक 6 वर जाधव धनश्री दिपक असे नाव आहे.

5) लाभार्थी प्रस्तावावर एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्प अधिकारी व सभापती यांच्या मंजूरी बाबत स्वाक्ष-या नाहीत.

6) लाभार्थी यांनी 10 टक्के रक्कम भरणा केलेबाबत भरणा पावत्या उपलब्ध केलेल्या नाहीत.

7) सायकल खरेदी करतांना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/ प्र.क्र.49/पंरा.7, दिनांक 07/02/2013 नुसार ई-निविदा प्रसिध्दी केलेली नाही.

**4.456 पंचायत समिती सेस अंतर्गत इयत्ता 7 वी ते 12 पर्यंतच्या मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनांतर्गत अखर्चित रकमेबाबत.**

**पंचायत समिती कुडाळ, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती सेस अंतर्गत इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंतच्या मुलांना संगणक प्रशिक्षण देणे या योजने अंतर्गत रक्कम रुपये 1,05,000/- खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती टिप्पणी व खर्च आदेशानुसार लाभार्थी प्रस्ताव व वितरण रजिस्टरची मागणी केली असता सदर योजनेसंदर्भात लाभार्थींचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. तसेच सदर योजनेसाठी धनादेशाने काढण्यात आलेल्या रकमेचे वितरण करण्यात आल्याचे दिसून आलेले नाही. रक्कम मंजुर असून व धनादेश काढण्यात आलेला असून सदर रकमेचे वितरण का करण्यात आलेले नाही, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना काटेकोरपणे राबविणेबाबत परिशिष्ट ई मध्ये वेळापत्रक दिलेले आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) प्रस्ताव न घेता 30 लाभार्थी कोणत्या आधारे निश्चित करण्यात आले व रकमेचा धनादेश काढण्यात आला, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

4) योजनेची अंमलबजावणी विहित मुदतीत न केल्याने लाभार्थी वंचित राहिले व या योजनेचे उद्दिष्ट सफल झाले नाही.

सदर योजनेत लाभार्थीसाठी काढण्यात आलेली रक्कम तात्काळ विहीत लेखाशीर्षाखाली जमा करावी.

**4.457 महिला बालकल्याण अंतर्गत पंचायत समिती सेस मधून 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरवठा करणे कामी केलेल्या खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती कुडाळ, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर योजनेंतर्गत प्रमाणक क्रमांक 13, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 1,25,285/- खर्च नोंदविण्यात आला असून झालेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक जा क्र.पंसकु/ग्राप/प्रस्ताव/6026/16, दिनांक 29/03/2016 ने पुरवठेदार यांना 17 शिलाई मशिन पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले. त्या अनुषंगाने विहित मुदतीत शिलाई मशिन पुरविण्यात आल्या किंवा कसे, याची पडताळणी करण्यासाठी डिलीव्हरी कार्यनस्तीत आढळून आले नाही. तसेच साठा रजिस्टरवरही

साहित्य प्राप्त झाल्याच्या तारखेची नोंद नाही. परिणामी सायकलचा पुरवठा केव्हा झाला, विहीत मुदतीत झाला किंवा कसे, याची पडताळणी करता आलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 मधिल नियम 83(3) नुसार वस्तुचा दर्जा व चाचणी अहवाल संबधितांनी घेणे आवश्यक आहे. तथापि, तो कार्यनस्तीत आढळून आलेला नाही. परिणामी शिलाई मशिन योग्य प्रतीच्या असल्याची खात्री होत नाही.

3) खरेदी प्रक्रीया शासन निर्णय, महाराष्ट्र शासन, उद्योग व उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भां.ख.रा/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4/मादाम काम रोड/हुतात्मा चौक, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद 11 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची खरेदी प्रतिवर्षी 15 फेब्रुवारी पर्यंतच करणे आवश्यक आहे. परंतु, तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) कार्यालयाने 17 लाभार्थ्यांसाठी 17 शिलाई मशिन खरेदी केल्या त्या अनुषंगाने वितरण रजिस्टर व 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केल्याची चलनाची तपासणी केली असता लेखापरीक्षण कालावधी पर्यंत 9 शिलाई मशिनचे वितरण झाल्याचे आढळून आले. उर्वरित शिलाईमशिन अद्याप वितरीत करावयाच्या प्रलंबित असल्याचे आढळून आले. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/1997 मधिल अट क्रमांक 5 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांस लाभ देणे बंधनकारक असताना पंचायत समितीने केलेले नाही. म्हणजेच सदर वित्तीय वर्षात योजनेचे 100 टक्के उद्दिष्ट साध्य झाल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भारास 1093/प्र.क्र.1239/37, दिनांक 01/10/1993 नुसार लाभार्थीचे गाववार मास्टर रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे एखादया व्यक्तीला दुबार लाभ झाला किंवा कसे याबाबतची खात्री करता आलेली नाही व लाभार्थीचे एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले याबाबतचे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. परिणामी विहीत मुदतीत व एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले याबाबत खात्री करता आलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 अन्वये वाटप केलेल्या साहित्याची पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत खात्री करुन लाभार्थ्याची आर्थिक स्थिती अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तथापि, तशा प्रकारचा अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध झालेला नाही.

7) पुरवठा केलेल्या साहित्यावर “पंचायत समिती सेस महिला बाल कल्याण योजना सन 2015-2016 अंतर्गत पुरवठा” असे पक्क्या शाईन लिहिल्याचा अहवाल नाही.

**4.458 पंचायत समिती सेसमधुन महिलांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत 10 टक्के हिस्सा घेऊन शिलाई मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती सुरगाणा, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 42) -** पंचायत समिती सुरगाणा सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेसमधुन महिला बाल कल्याण विभागामार्फत महिलांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत 10 टक्के हिस्सा घेऊन शिलाई मशिन पुरविणे या योजनेवर प्रमाणक क्रमांक 9, दिनांक 31/03/2016, रक्कम रुपये 1,48,000/- अन्वये याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमजबजावणी नमुद वेळापत्रकानुसार राबविणेत आलेली नाही.

2) पंचायत समिती, सुरगाणा यांनी मंजुर केलेल्या लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निवड केलेल्या लाभार्थी यांची खात्री करता आली नाही. लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले लाभार्थीचे मागणी संदर्भाचे प्रस्ताव व अर्जाची छाननी केली असता लाभार्थीचे अर्ज मुदतीत प्राप्त झालेबाबत खात्री करता आली नाही.

अर्ज कधी प्राप्त झाले व आवक बारनिशीत तश्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थीची निवड योग्य झाली किंवा कसे ? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3) लाभार्थी हिस्सा 10 टक्के जमा केल्याचा तपशील लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे खात्री करता आली नाही. तरी लाभार्थी हिस्सा 10 टक्के जमा केल्याची कागदोपत्री खात्री पटवावी. शिलाई मशीनची किंमत रुपये 6,187/- ( बाजार दर खात्री करण्यात आली नाही ) नुसार 10 टक्के लाभार्थी हिस्सा रुपये 619/- वजा जाता रुपये 5,568/-X 24 = 1,33,632/- प्रदान करणे आवश्यक होते. मात्र पंचायत समितीने रक्कम रुपये 1,48,000/- प्रदान केली आहे. ज्यादा प्रदान रक्कम रुपये 14,368/- लाभार्थी हिश्श्यातून वसुल करुन पंचायत समिती सेसमध्ये जमा करुन अनुपालन सादर करावे.

4) पंचायत समितीने शासन दर करार खात्री करणे आवश्यक होते. तसेच महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार विहित कार्यवाही करणे आवश्यक होते. तसे न करता भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्यादित, मुंबई यांचे दरकारानुसार खरेदी केले. दरकरारानुसार 98 टक्के रक्कम वस्तुचा पुरवठा झाले नंतर व 2 टक्के रक्कम वस्तु सुस्थितीत व चालू कंडीशननुसार देणे आवश्य होते. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

5) सदर 24 शिलाई मशिन प्राप्त झालेबाबत विहित साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे साठा नोंदवहीत शिलाई मशीन नोंदीची पडताळणी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. लेखापरिक्षणापावेतो पंचायत समितीने निवड व मंजूर केलेल्या लाभार्थी यांना शिलाई मशीन वाटप झालेले नसून पंचायत समितीस्तरावर 24 नग शिलाई मशिन शिल्लक आहेत. विनावाटप पडून असलेले शिलाई मशीन विहित वारंटी कालावधी संपल्यानंतर खराब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पंचायत समितीची राहील.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-1094/ सीआर-2239/34/67 दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीस शिलाई मशीन दिल्यानंतर सक्षम अधिका-यांनी पाहणी करुन लाभार्थीची आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली याबाबतचा फलश्रुती अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार मंजूर लाभार्थीना शिलाई मशील तात्काळ वाटप करुन तपासणी अधिका-यांचा अहवाल उपलब्ध करुन लेखापरीक्षणास सादर करावे

7) मास्टर नोंदवहीत लाभार्थी नोंद घेवून परिपूर्ण नोंदवहीसह दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री करुन मास्टर नोंदवही लेखापरीक्षणाला सादर करावी.

8) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचना नुसार मुल्यवर्धीत करासाठी नोंदणीकृत ठेकेदार असल्यास 2 टक्के मुल्यवर्धीत कर रक्कम रुपये 2,960/- कपात करणे आवश्यक आहे. अन्यथा पुरवठादाराकडून 5 टक्के मूल्यवर्धित कर वसूल करावा. अमेय कॉम्पुटर्स, नाशिक यांचे बिल क्रमांक 230, दिनांक 13/03/2016 मधून नियमानुसार रक्कम रुपये 2,960/- आयकर कपात करण्यात आला नाही. पुरवठादाराचे pan card प्रत प्राप्त करावी अन्यथा 20 टक्के आयकर कपातीची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

**4.459 10 टक्के पंचायत समिती उपकरातुन इयत्ता 5 वी ते 10 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व साधारण घटकातील विद्यार्थिनीना 90 टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** 10 टक्के पंचायत समिती उपराकरातून इयत्ता 5 वी ते 10 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व साधारण घटकातील विद्यार्थिनीना 90 टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे यावर रक्कम रुपये 2,91,564/- खर्च नोंदविणेत आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील मुद्दा क्रमांक 3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे व त्या सोबतचे परिशिष्ट - इ नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड व साहित्य वाटप करणे बाबतचे वेळापत्रक निश्चीत करुन, संबंधीत योजनेचा लाभ वित्तीय वर्षाच्या 30 नोव्हेंबर पर्यंत लाभार्थीस प्रदान करणे आवश्यक असताना दिनांक 31/03/2016

अखेर लेडीज सायकल 28 नग शिल्लक आहेत. उपरोक्त नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही का करण्यात आलेली नाही, याबाबतचा खुलासा करावा.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/2012/प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये लाभार्थ्यांची यादी निश्चित करणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- 1096/प्र.क्र.78/5, दिनांक 09/05/1997 चे परीच्छेद क्रमांक 3 प्रमाणे लाभार्थी निवड प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण झाल्यानंतरच खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-झेडपीए-2013/प्र.क्र.76/ पं.रा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये सुचित केल्याप्रमाणे गट-अ च्या प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनासाठी एकूण निधीच्या 50 टक्के खर्च करावा. व गट-ब च्या योजनांवर म्हणजे वस्तू व साहित्य खरेदीवर एकूण खर्चाच्या 50 टक्के पेक्षा जास्त खर्च करु नये, असे निर्देश असताना, गट-ब च्या वाटप योजनेसाठी एकूण खर्चापेक्षा रक्कम रुपये 1,05,782/- जादा खर्च नोंदविणेत आलेला आहे.

शासन आदेशानुसार गट-ब वरील राबवावयाच्या योजनांवर करावयाच्या खर्चाच्या विहित मर्यादेपेक्षा जादा खर्च नोंदविलेला आहे. त्यामुळे गट-अ वरील योजनांवर विहित मर्यादेपेक्षा कमी खर्च झालेला आहे. तसेच एकूण खर्चाच्या 3 टक्के रक्कम अपंग महिला आणि बालकांसाठी खर्च करणे बंधनकारक असताना**,** अपंगासाठी निर्धारीत 3 टक्के खर्च सदर योजनेतून करणेत आलेला नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-मागाव/पंरास/1098/प्र.क्र.73, दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थी निवड केलेबाबत विवरणपत्र-अ मध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन लाभार्थ्यास दुबार फायदा घेता येणार नाही व योजनेवर यथोचित नियंत्रण ठेवता येईल. तथापि, सदरची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्याअभावी लाभार्थीस योजनेचा दुबार फायदा झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास- 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वाटप साहित्याची गट विकास अधिकारी/सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन व लाभार्थ्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ झाला असलेबाबत व फलश्रुती बाबत अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तथापि, असा अहवाल तयार करणेत आलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- मागास -1093/ प्र.क्र.1239/ 34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांना दिलेल्या साहित्याची दर सहा महिन्यांनी पाहणी करुन साहित्य, वस्तु इत्यादी सुस्थितीत व वापरात असले बाबत खात्री करुन तसा अहवाल सादर करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**4.460 उपकरच्या 10 टक्के निधीतुन विद्यार्थीनींना लेडिज सायकल पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती पाथर्डी, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** उपकरच्या 10 टक्के निधीतुन विद्यार्थ्यांनीना लेडिज सायकल पुरविणेबाबत पंचायत समितीने रक्कम रुपये 88,296/- खर्च केला असुन याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

2) साठा नोंदवहीची पडताळणी केली असता, पुरवठादाराचे delivery challan no.357 दिनांक 17/04/2016 अन्वये नोंदवही पृष्ठ क्रमांक 16 वरील नोंदीनुसार दिनांक 17/04/2016 रोजी माल प्राप्त झाला असून, नमुद देयक दिनांक 30/03/2016 ला अदा करण्यात आले आहे. त्यामुळे मालाचे पुरवठा होण्याआधीच रक्कम खर्च झाल्याचे दिसते.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार पुरवठा 30 दिवसाचे आत न केल्यास 1.5 टक्के प्रति आठवडा दंड आकारला जाईल. परंतु, पुरवठादाराने उशीरा मालाचा पुरवठा करुनही विभागामार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) लाभार्थी निवड प्रक्रिया लेखे, लाभार्थी प्रस्ताव, सायकल तपासणी अहवाल याबाबत अभिलेखे पडताळणीस प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड नियमोचित झाल्याची व पुरवठा झालेला मालाच्या दर्जाबाबत अचूकता तपासणी करता आली नाही.

5) साठा नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरिक्षण कालावधी पावेतो सर्व 26 सायकली शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही. केवळ तरतुद उपलब्ध आहे म्हणुन अनुदान खर्च करण्याचे उददेशाने अनावश्यक खरेदी करण्यात आली आहे. तरी अनावश्यक खरेदी केलेल्या सायकलींची एकूण रक्कम रुपये 88,296/- संबंधीतांकडून वसुल करण्यात यावी.

6) पुरवठादाराचे देयकातून आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार 2.30 टक्के आयकर रक्कम रुपये 2,031/- वसुल केलेला नाही. तरी सदर रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करावा.

7) उक्त नमुद शासन परिपत्रकानुसार नियोजन न केल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

**4.461 पंचायत समिती सेस फंडातून 10 टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4)** - पंचायत समिती संगमनेर अंतर्गत पंचायत समिती सेस फंडातुन 10 टक्के महिला व बालकल्याण योजना अंतर्गत इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंत शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांनींना लेडीज सायकल पुरविणेसाठी ही योजना राबविण्यात आली आहे. यावर रक्कम रुपये 2,64,888/-खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची निवड पंचायत समिती ठरावान्वये केली असुन ठरावात लाभार्थींची मंजुर यादी नमुद केलेली नाही. त्यामुळे लाभार्थींची निवड कशाचे आधारे केली याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/ 2000/प्र.क्र. 446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्राकानुसार राबविणेत आलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक 10958/प्र.क्र. 73/74, दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थींची प्रपत्र -अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवुन दुबार लाभ प्रदान टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) जिल्हा परिषदचे महिला व बालकल्याण विभागाने राबविलेल्या खरेदी प्रकियेची प्रशासकिय व तांत्रिक मंजुरीचे आधारे पंचायत समिती संगमनेरने मे. वर्षा ट्रेडिंग क. यांना पुरवठा आदेश दिलेला आहे. तथापी सदर खरेदीकामी समितीने निविदा प्रक्रिया न राबविता जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या कार्यवाही प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदरचा दरकरार नस्तीत आढळुन आलेला नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/सीआर/1633/57, दिनांक19/01/1985 नुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी हिशाची रक्कम वसुल करणे आवशक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) पुरवठादाराचे देयकातुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार 2 टक्के आयकर रक्कम रुपये 5,298/- वसुल केलेला आहे. सदर रक्कम शासन सदरी भरणा करून अनुपालन दर्शवावे.

7) श्रीमती पुष्पलता चांगदेव चौधरी यांचे प्रस्तावासोबत उत्पन्नाचा दाखला, श्रीमती संगिता कोंडीभाऊ मधे यांचा जातीचा दाखला, श्रीमती प्रितम दगडू खेमनर, यांचा जातीचा दाखला, श्रीमती अर्चना मच्छिंद्र वाघचौरे यांचा उत्पनाचा दाखला प्रस्ताव सोबत जोडलेला नाही.

8) साठा नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरिक्षण कालावधी पावेतो एकूण 78 सायकली खरेदी केली असुन 78 सायकली शिल्लक आहेत. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

**4.462 उपकरच्या 20 टक्के व 10 टक्के निधीतुन महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे बाबत.**

**पंचायत समिती राहता, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10 व 15) -** उपकरच्या 20 टक्के निधीतुन मागासवर्गीय महिलांना व उपकराच्या 10 टक्के निधीतून ग्रामीण भागातील महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे बाबत पंचायत समितीने रक्कम रूपये 8,43,900/- खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

2) लाभार्थी निवड प्रक्रिया लेखे, तपासणी अहवाल याबाबत अभिलेखे पडताळणीस प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड नियमोचित झाल्याची व पुरवठा झालेला मालाच्या दर्जाबाबत अचूकता तपासणी करता आली नाही.

3) लाभार्थ्यांचे एकूण 19 प्रस्ताव तपासणीस प्राप्त झाले नाहीत. तसेच प्राप्त प्रस्तावावर गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

4) साठा नोंदवहीतील नोंदीनुसार लेखापरिक्षण कालावधी पावेतो एकाही लाभार्थ्यास लाभ दिलेला नसून, 87 नग पिको फॉल मशिन अद्यापपावेतो शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

**4.463 उपकर निधीतून महिलांना पीठ गिरणी खरेदी करणे अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती हवेली, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 41) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपी.ए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिच्छेद 'ई' मध्ये केले प्रमाणे दिनांक 30/11/2015 अखेर लाभार्थींना साहित्याचा वाटप करुन माहे मार्च, 2016 पर्यंत लाभार्थींचे विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1094/सी आर/2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहित नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातनिहाय, गाव निहाय, कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थींच्या सर्व नोंदी जातनिहाय, गाव निहाय व कुटुंबनिहाय घेवुन शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस/कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करुन लाभार्थींची आर्थिक उन्नती झाली किंवा कसे याबाबत फलश्रुती अहवाल दप्तरी नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थींची निवड करुन विषय समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केली नाही. सदर नियमबाहयतेबाबत योग्य तो खुलासा करावा.

5) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय डिसेंबर, 2010 नुसार रुपये 10.00 लाखपेक्षा ज्यादा रक्कमेच्या खरेदीसाठी जाहिर ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

6) सदरील साहित्याची पुरवठा करण्यापूर्वी सक्षम शासकीय संस्थेकडून तांत्रिक चाचणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. साहित्याची गुणवत्ता प्रमाणित होत नाही.

**4.464 10 टक्के अनुदानातून सर्वसाधारण महिलांना पिठ गिरणी पुरवठा करणे मधील अनियमिततेबाबत. (जिल्हा परिषद निधी)**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समिती खेड कडील महिला बालकल्याण विभागातील जिल्हा परिषद निधीतुन लाभार्थींना 10 टक्के अनुदानावर पिठ गिरणी पुरवठा करणे अंतर्गत एकुण 182 नग वर रक्कम रुपये 32,41,602/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थींच्या मंजुर यादीची तपासणी केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला बालकल्याण याची 110 लाभार्थींची एक मंजुर यादी 65 लाभार्थींची एक मंजुर यादी व 57 लाभार्थिंची एक मंजुर यादी अशा एकुण 232 लाभार्थांची मंजुर यादी पंचायत समिती, खेडच्या महिला बालकल्याण विभागाच्या नस्तीसोबत असलेची दिसुन आली. उपरोक्त मंजुर यादीपैकी 57 लाभार्थींची यादीची झेरॉक्स प्रत दप्तरी आहे. सदर बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 20, दिनांक 08/05/2017 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला बालकल्याण यांच्या 57 लाभार्थींची मुळ शाईच्या स्वाक्षरीची मंजुर यांदी पंचायत समिती खेडच्या दप्तरी नसलेबाबत कळविले होते. त्यानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती खेड यांनी दिनांक 17/05/2017 नुसार अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरानुसार पंचायत समिती खेड अंतर्गत महिला बालकल्याण विभागाकडील साहित्य वाटपामध्ये अनियमितता / गैरव्यवहार असल्याची शंका असलेने महिला व बालकल्याण विभागाची संपुर्ण चौकशी केली असता संबंधित कर्मचारी यांनी पदभारामध्ये दिलेली 57 लाभार्थींची मंजुर लाभार्थींची छायांकित प्रत खोटी असलेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती खेड यांनी खुलासा केला आहे. परंतु, साठा नोंदवहीची तपासणी केली असता सदर सर्व 57 लाभार्थीना पीठ गिरणी वाटप केला असलेचे लेखापरिक्षणाचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब गंभीर व नियमबाहय असुन मंजुरीविना केलेला साहित्याचा वाटप लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. सबब, एकुण 57 लाभार्थींची पीठ गिरणीची रक्कम रुपये (17811x57) = रूपये 10,15,227/- लेखापरिक्षणात वसुलपात्र ठरविणेत येत आहे. सदर रक्कम सबंधिताकडुन वसुल करुन जिल्हा परिषद निधीमध्ये भरणा करावे. सदर प्रकरणाबाबत पंचायत समिती स्तरावर समिती नेमुन समितीच्या अहवालानुसार सदरची यादी खोटी असलेचे निदर्शनास आल्याने संबंधीतावर खेड पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाबाबत गटविकास अधिकारी यांनी जावक क्रमांक आस्था/1/वशी/3785/2017, दिनांक 04/01/2017 अन्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद पुणे यांना कळविले असून व त्या संदर्भात अंतर्गत लेखापरिक्षणाची मागणी केलेली आहे. सदर बाबत योग्य ती तपासणी करुन तसा अहवाल लेखापरिक्षणास सादर करावा. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 1968 मधील नियम 36 नुसार जेव्हा परिषदेच्या किंवा समितीच्या पैशाच्या किवा इतर मौल्यवान चिजवस्तु याचा अपहार किंवा अफरातफर किंवा पैसा किंवा माल किंवा जिन्नस किंवा वस्तु यांचेबाबतीत चोरी, हयगय किंवा इतर कारणाने झालेली हानी उघडकीस येईल, तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांनी तात्काळ चौकशी करुन आणि अपहार, अफरातफर किंवा हानी याबाबतची वस्तुस्थिती आयुक्त व सांविधिक लेखापरिक्षक यांना कळविणे आवश्यक होते. परंतु, सदर बाबतीत सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे व आयुक्त पुणे यांना कळविले नसलेचे निदर्शनास आले आहे.

2) लाभार्थींच्या प्रस्तावाची तपासणी केली असता मोठया प्रमाणावर प्रस्तावामध्ये त्रुटी असलेचे निदर्शनास आले आहे. प्रस्ताव परीपुर्ण नसतांना मंजुरी कोणत्या आधारे देण्यात आली, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काही लाभार्थीचे प्रस्ताव अपुर्ण असतांना पीठगिरण्यांचा वाटप व मंजुरी देणेत आली आहे. सदरची बाब नियमबाहय आहे.

अ) मंजुर यादी लाभार्थीसंख्या 110 मधील प्रस्तावांची तपासणी केली असता 41 प्रस्तावांच्या त्रुटी आढळून आल्या आहेत.

ब) मंजुर यादी एकूण लाभार्थीसंख्या 65 मधील प्रस्तावांची तपासणी केली असता 11 प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

क) मंजुर यादी लाभार्थीसंख्या 57 मधील प्रस्तावांची तपासणी केली असता 33 प्रस्तावांमध्ये कागदपत्रांच्या संदर्भात त्रुटी आढळून आल्या आहेत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपी.ए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिच्छेद 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही. दिनांक 31 मार्च अखेर साहित्याचा वाटप करुन विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु, 31 मार्च अखेर तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

4) जिल्हा परिषदेकडील पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार सर्व साहित्य निविदेतील वर्णनानुसार गुणवत्तेचे व दर्जाचे असणे बंधनकारक राहील. सदर साहित्याचा पुरवठा झालेनंतर उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील मान्यताप्राप्त संस्थाकडील साहित्यामधील 1 ते 2 टक्के इतके नमुना साहित्याची पुन्हा तपासणी करावी व त्याचा खर्च पुरवठादाराने करणेचा आहे. परंतु, तशा प्रकारची तपासणी करुन घेतली नाही. त्यामुळे योग्य प्रकारे साहित्य प्राप्त झालेची व सुस्थितीत असलेची खात्री करता आली नाही. सदर बाबत तपासणी अहवाल दप्तरी नाही.

5) जिल्हा परिषदेकडील पुरवठ्यातील अट क्रमांक 9 नुसार साहित्याची हमी कालावधी एक व दोन वर्ष वॉरंटी राहील. सदर कालावधीमध्ये तक्रार प्राप्त होताच दुरुस्ती विनामुल्य व सत्वर करणेची आहे. पंचायत समितीकडे अशा प्रकारे पीठगिरण्या असतील तर उपरोक्त अटी नुसार पुरवठादारास कळविले किंवा कसे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) जिल्हा परिषदेकडील पुरवठा आदेशातील अट क्रमांक 11 नुसार लाभार्थीकडुन विहीत मुद्रांकावर सर्वसाधारण अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करुन घेणे आवश्यक आहे परंतु करारनाम्यावर करारनामा करुन घेणारा अधिकारी यांच्या कोणत्याही करारनाम्यावर स्वाक्षऱ्या नाही, व करारनामे अपुर्ण आहेत त्यामुळे केलेला करारनामा ग्राह्य धरता येणार नाही.

7) लाभार्थीच्या मंजुर यादीचा व साठानोंदवहीवरील प्रत्यक्ष वाटप केलेल्या लाभार्थीच्या प्रस्तावाची तपासणी केली असता, लाभार्थीची नावे मंजुर यादीमध्ये नसतांना त्यांना पिठगिरणी वाटप केली आहे. सदरची बाब नियमबाहय असुन मंजुरीशिवाय केलेला पीठगिरणी वाटप लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. सबब मंजुरीशिवाय वाटप एकुण 8 पीठगिरण्यांची रक्कम रुपये 17,811x8 = 1,42,488/- संबंधिताकडुन वसुल करुन जिल्हा परिषद निधीमध्ये भरणा करावी.

8) पुरवठा आदेशानुसार लाभार्थी हिस्सा 10 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 1,781/- वसुल करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात पेटी कॅशबुक ठेवुन रक्कम धनाकर्षाव्दारे जिल्हा परिषदेकडे सादर करणेची आहे. परंतु, पंचायत समितीने सदर योजनेअंतर्गत 182 लाभार्थीना पिठगिरण्या वाटप केल्या असुन 175 लाभार्थीचा लाभार्थी हिस्सा जिल्हा परीषदेकडे भरणा केला आहे. उर्वरीत 7 लाभार्थीचा लाभार्थी हिश्श्याची रक्कम रुपये 1,781x07 =12,467/- संबंधिताकडुन वसुल करुन जिल्हा परीषदेकडे भरणा करणेत यावी.

9) श्रीमती सुनिता रामचंद्र कड - कडाचीवाडी यांना स्टॉकबुक पान नंबर 103 अनुक्रमांक 89 नुसार पिठगिरणीचा वाटप केला असतांना स्टॉकबुक पान नंबर 157 अनुक्रमांक 45 वर त्याच लाभार्थीला श्रीमती सुनिता रामचंद्र कड - कडाचीवाडी यांना पिठगिरणीचा दुबार वाटप केला असलेचे लेखापरीक्षणाचे निदर्शनास आले आहे. म्हणजे एका लाभार्थीला दुबार लाभ दिला आहे. सदरची बाब नियमबाहय आहे. त्यामुळे एका पीठगिरणीची किंमत रक्कम रुपये 17,811/- संबंधिताकडुन वसुल करुन जिल्हा निधीमध्ये भरणा करावी.

10) लाभार्थीच्या साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही पान क्रमांक 165 वर 7 लाभार्थीना पिठ गिरण्या वाटप केल्या आहेत. सदर पीठगिरण्या पंचायत समितीला केव्हा प्राप्त झाल्या, याबाबत साठा नोंदवहीवर नोंद दिसुन येत नाही. त्याचप्रमाणे सदर बाबतचा पुरवठा आदेश दप्तरी नसतांना सदर पिठगिरण्या संबंधित लाभार्थीना वाटप केल्यामुळे अनियमितता झाली आहे.

11) सदर योजना 2015-2016 मधील असुन प्रस्ताव माहे मार्च 2016 नंतर आलेचे दिसुन येते व वाटप माहे मार्च 2016 नंतर केला असलेचे दिसुन येते. सदर अनियमिततेबाबत खुलासा करावा. लाभार्थींचे विनियोग दाखले घेणेत आले नाही.

12) पंचायत समिती खेड लेखापरीक्षण सन 2015-2016 या कालावधीमध्ये ग्रामविकास जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्र. 4 मध्ये नमूद केले प्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहित नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातनिहाय, गावनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार पंचायत समितीकडून वैयक्तिक सहाय्य दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थींच्या सर्व नोंदी जात व गाव निहाय घेऊन शासन निर्णयात अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस कुटुंबात / दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री करण्याकरीता नोंदी अद्यावत असलेली मास्टर नोंदवही उपलब्ध न झालेने योग्य ती खात्री करता आली नाही.

13) लाभार्थींच्या प्रस्तावाची तपासणी केली असता ब-याच अर्जावर अर्ज प्राप्त झाल्याची व आवक नोंदवहीला नोंद घेतलेबाबत आवक नोंदवहीतील लाभार्थींच्या अर्जावर शिक्यासह क्रमांक नोंदविणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्यामुळे लाभार्थीची निवड योग्य झालेची खात्री करता आली नाही.

14) लाभार्थींच्या प्रस्तावाची तपासणी केली असता लाभार्थींच्या उत्पन्नाचा व रहिवाशी दाखला तसेच इतर दस्ताऐवज माहे 31/03/2016 नंतरचे असलेचे लेखापरीक्षणाचे निदर्शनास आलेले आहे. सदर योजना ही सन 2015-2016 मधील असून लाभार्थीचे दाखले दिनांक 31/03/2016 नंतरचे असलेने सन 2015-16 या वर्षातील लाभार्थींची केलेली निवड योग्य प्रकारे झाली असे म्हणता येणार नाही.

**4.465 पंचायत समिती उपकर निधीतून महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण (शिलाई मशिन) प्रशिक्षण देणेबाबत.**

**पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती दौंड, महिला व बालकल्याण विभागाकडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपकर निधीतुन 90 टक्के अनुदानावर महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण (शिलाई मशिन) करणेबाबतची नस्ती, प्रस्ताव यांचे लेखापरीक्षण केले असता रक्कम रुपये 4,59,000/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1020/प्र.क्र.1418, दिनांक 09/02/2001 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुनच साहित्य खरेदी अथवा योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-/2008/प्रक्र-446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही.

एकूण 4 ग्रामपंचायती अंतर्गत प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात आली असुन प्रशिक्षणाचे तास 270 असुन प्रशिक्षण 50 दिवसांसाठी आहे.

2) सदर प्रक्षिक्षणासाठी एकूण रक्कम रुपये 5,10,000/- असल्याने ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पं रा-7, दिनांक 07/02/2013 नुसार शासनाने पंचायत राज संस्थाअंतर्गत रुपये 1,00,000/- व त्यापेक्षा अधिक किंमतीची साहित्य खरेदी / सेवापुरवठा यासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक आहे. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2013/275/प्र.क्र.172, दिनांक 19/10/2011 नुसार साहित्य खरेदी व सेवा पुरवठा शासनाद्वारे दरकरार केलेल्या वस्तू या दरकरारानुसार त्या यंत्रणेकडूनच खरेदी करण्यात याव्यात. मात्र या वस्तू / साहित्याचा दर्जा व प्रत खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची आहे. त्यासाठी शासनाच्या सक्षम यंत्रणेकडून विहीत कार्यपध्दती अनुसरुन तांत्रिक तपासणी करुन घेण्यात

यावी. तथापि, याप्रमाणे पंचायत समितीने कार्यवाही केलेली नाही. ई-निविदा न मागविताच आर्ट ॲण्ड स्टाईल, रास्ता पेठ, पुणे यांना पुरवठा आदेश दिला आहे.

तसेच प्राप्त दरपत्रके तपासता 1. पिंपरी चिंचवड वुमन वेलफिअर असोसिएशन, 2. आर्ट ॲण्ड स्टाईल, रास्ता पेठ, पुणे, 3. संकल्प एज्युकेशन सोसायटी, बालाजीनगर, धनकवडी, पुणे यांचे दरपत्रकावर प्रशिक्षणाचा प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन दर नमूद नसताना दरांबाबतचे अंदाजपत्रक प्राप्त नसताना तुलनात्मक तक्त्यात दर नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे तुलनात्मक तकत्यातील दरात आर्ट ॲण्ड स्टाईल, रास्ता पेठ, पुणे यांचेच दर सर्वात कमी व किफायतशीर असलेबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे त्यांना अनियमितपणे प्रशिक्षण - ठेक्याचे काम देणेत आले आहे. सदर बाब गंभीर स्वरुपाची आहे. तसेच प्रशिक्षण घेणेसाठी आवश्यक असणारे साहित्य, शिलाई मशिन आदी मुबलक प्रमाणात लाभार्थी संख्येनिहाय उपलब्ध असलेबाबतचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

3) दिनांक 01/03/2016 ते दिनांक 09/04/2016 असे 50 दिवस प्रशिक्षण एकही सुटटी न देता कसे राबविण्यात आले. तसेच तरतुद उपलब्ध असुनही प्रशिक्षण कालावधी हा पुढील वित्तीय वर्षात गेल्याने उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे योजना विहीत मुदतीत राबविणेचा शासनाचा उददेश सफल होत नाही.

तसेच प्रशिक्षण हे दिनांक 19/04/2016 रोजी पुर्ण झाले असतानाही देयकाचे रकमेचे प्रदान प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण झालेनंतर करणे आवश्यक असताना तत्पूर्वीच दिनांक 31/03/2016 रोजी आगाऊ करण्यात आले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय / गावनिहाय व कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए2013/प्र.क्रं.76/पं.रा-.1, दिनांक 24/01/2014 नुसार 10 टक्के रक्कम लाभार्थींनी भरणेची आहे. परंतु 10 टक्के रक्कम भरणा केले बाबत भरणा चलने संबंधीत संस्थेकडील पोहच / अभिलेखे उपलब्ध झाले नाही. त्याअनुषंगाने 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसुल करण्यात यावा व त्याबाबतची चलने, पोहोच, लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात यावे.

6) लाभार्थींनी प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे ही साक्षांकित केलेली नाही.

7) लाभार्थींना प्रशिक्षण योग्य प्रकारे दिलेबाबत ग्रामपंचायतीमधील दोन प्रतिष्ठित नागरीकांचा अहवाल सोबत जोडलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स/1080/सीआर/ 1074/57, दिनांक 29/09/1983 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक 123 9/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करून लाभार्थीची आर्थिक उन्नत्ती झाली किंवा कसे, याबाबत फलश्रुती अहवाल दिलेले नाहीत.

9) सदरचे देयकातुन सेवाकर नियम 1994 चे कलम 4 मधील सुधारणा 2011 नुसार दिनांक 01/04/2012 पासून सेवाकर 12.36 टक्के वसुल करणे आवश्यक असताना, सेवाकर वसुल केलेला नाही. सबब रक्कम रुपये 459000 X 12.36 टक्के = 56,732/- सेवाकर वसुल करण्यात येवुन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावा.

**4.466 90 टक्के अनुदानावर महिलांना पिठ गिरणी पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती दौंड, महिला व बालकल्याण विभागाकडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपकर निधीतुन 90 टक्के अनुदानावर महिलांना पिठगिरणी वाटप करणेबाबतची नस्ती तपासता सदरची ई-निविदा पध्दती ही जिल्हा परिषदेने राबविली असुन त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्राचे अनुषंगाने पंचायत समितीने त्या

पुरवठादारास पुरवठा आदेश दिलेले असुन सदर योजनेवर रक्कम रुपये 4,80,897/- खर्च करणेत आलेला आहे. योजनेची संचिका, प्रस्ताव व साठा नोंदवही यांचे लेखापरीक्षण केले असता त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेकडील ई-निविदा पध्दतीची अंमलबजावणी ही क्रमांक 6/15-16, दिनांक 06/11/2015 रोजी राबविली असुन सदर निविदा ही जिल्हापरिषद स्वनिधीतील खर्चाचे अनुषंगाने राबविली असुन त्यात इतर तालुक्यांची मागणी एकत्रित करुन प्रकीया राबविलेली दिसून येत नाही. कारण पंचायत समितीने योजनेची व लाभार्थ्यांची निवड, तसेच खर्चास तांत्रिक मान्यता तद्नंतर म्हणजेच दिनांक 06/11/2015 नंतर घेतलेली आहे. सर्व तालुक्यांचा एकत्रित मागणीचा विचार करुन प्रकिया पार पाडली असता त्यांना याही पेक्षा कमी / माफक दर व स्पर्धात्मक दराचा लाभ झाला असता. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1020/प्र.क्र.1418, दिनांक 09/02/2001 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुनच साहित्य खरेदी अथवा योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्र.4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुण्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय / गावनिहाय व कुटुबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थीच्या सर्व नोंदी जात व गावनिहाय व कुटुंबनिहाय घेवुन शासन निर्णयातिल अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी ए/2008/प्रक्र-446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही. सदर योजनेचा तांत्रिक मंजूरी आदेश उ.मु.का.अ.(बा.क.)जिल्हा परिषद पुणे, जावक क्रमांक जि.प./106/16, दिनांक 29/02/2016 व पंचायत समिती दौंड यांचा पुरवठा आदेश जावक क्रमांक वशी/136, दिनांक 08/03/2016 मधील अटी नुसार साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे असल्याबाबत चाचणी प्रमाणपत्र व अहवाल दप्तरी नाही.

4) पंचायत समिती ठरावामध्ये लाभार्थ्यांच्या नावानिशी लाभार्थी मंजूरीचा ठराव नाही.

5) प्रथम लाभार्थी हिस्सा प्राप्त करुन घेवून नंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना लाभार्थी हिस्सा महिला व बालकल्याण विभागास खालील धनाकर्षाने दिनांक 18/08/2016 व दिनांक 22/08/2016 रोजी विलंबाने भरणा केला आहे. तसेच लाभार्थी हिस्सा पुरवठादारास थेट भरणा न करता महिला व बालकल्याण विभागास भरणा करण्यात आला आहे. संबंधित पुरवठादारास लाभार्थी हिस्सा जमा झालेबाबतची पोहच दप्तरी उपलब्ध नाही.

6) माल प्राप्त झालेचे डिलीवरी चलनावर दिनांक नमूद नसल्याने त्याच वित्तीय वर्षात माल प्राप्त झालेचे दिसून येत नाही. पुरवठा आदेशातील वर्णना प्रमाणे व सुस्थितीत मिळालेबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी स्वाक्षरी करताना साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद केला नाही. त्यामुळे साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

7) 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरलेची चलने तपासता सदरची चलने लाभार्थ्यानी वैयक्तिक न भरता एकापेक्षा जास्त लाभार्थ्यांची रक्कम एकत्रितपणे भरलेली आहे. त्याअनुषंगाने चलनांचे मागे लाभार्थीची नावे नमूद नाही. तसेच लाभार्थी चलन भरणा नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे भरणा चलने कोणत्या लाभार्थ्यांची आहे. याची पडताळणी करता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1080/सीआर /1074/57, दिनांक 29/09/1983 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक 123 9/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करून लाभार्थीची आर्थिक उन्नत्ती झाली किंवा कसे, याबाबत फलश्रुती अहवाल दिलेले नाहीत.

**4.467 प्राथमिक शिक्षक - वेतन फरक देयकांबाबत.**

**पंचायत समिती वेल्हा, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वेल्हे अंतर्गत एकूण 3 प्राथमिक शिक्षकांना वेतन फरक अदा करण्यात आला आहे.

सदर प्राथमिक शिक्षक शिक्षण सेवक या पदावर कार्यरत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा यांचे आदेश क्रमांक जिप/प्राथ-1/सेवक7/307, दिनांक 07/07/2014 अन्वये दिनांक 01/03/2014 पासून नियमित वेतनश्रेणीमध्ये रुपये 5200-20200 ग्रेडपे रुपये 2,800/- मध्ये रुपये 8,560/- वर वेतन निश्चिती करण्यात आली. सदरचा आदेश दिनांक 07/07/2014 चा असल्याने माहे मार्च, एपिल, मे आणि जून महिन्याचा वेतन फरक त्यांना देय होता. तसेच जुलै महिन्याचे वेतन सुधारित दराने काढण्यात आले आहे. त्यानुसार वेतन फरकाचे विवरणपत्रकाची पडताळणी केली असता माहे मे आणि माहे जून महिन्यातील अदा मानधनाची रक्कम वजा करण्यात आलेली नाही. रक्कम रुपये 17,000/- जादा अदा मानधनाची रक्कम संबंधीत शिक्षकांकडून वसूलात आणावी व शासन सदरी योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

**4.468 शिलाई मशिन खरेदी ई-निविदा प्रक्रिया अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती खंडाळा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती ठराव क्रमांक 726 दिनांक 28/01/2016 ने मंजूर शिलाई मशिन तीन योजनांकरीता खरेदी रक्कम रूपये 43,45,041/- आहे. खरेदी प्रक्रियाबाबत लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुळात योजना राबविण्याची कार्यवाही उशीरा झाली आहे. पंचायत समितीने खर्चाबाबत ठराव माहे जानेवारी, 2016 मध्ये केला असताना तांत्रिक मंजूरीचे कार्य सत्वर होणे अपेक्षित असतांना माहे मार्च, 2016 मध्ये झाले आहे.

2) सदर खरेदीबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविली आहे. मात्र सदरबाबत संकेत स्थळावर प्रसिध्दी देणेपूर्वी शॉर्ट नोटीस वृत्तपत्रात पूर्व प्रसिध्दी केली नाही. यासाठी ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 19/10/2011 मधील मुद्दा क्रमांक 5(3) नुसार जिल्हा स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 138 नुसार स्थानिक वृत्तपत्र/शासन राजपत्र यात प्रसिध्द करुन सर्वांना मोकळेपणाने पाहता येतील, अशी तरतूद आहे. त्यामुळे सदर ई-निविदा जाहिरात व तिचा संकेतस्थळ याबाबत छोटी जाहिरात देणे आवश्यक होते.

3) महा टेंडर - Tender details पाहता जाहिरातींच्या बाबींचे शिर्षक पाहता Purchasing Novel Shilai Machine अशी आहे. म्हणजे ब्रँडनेमने मागविले आहे. याबाबतचे पंचायत समितीकडील शुध्दीपत्रक विना क्रमांक व विना दिनांक मधील अनुक्रमांक 1 ते 3 टंकलिखीत व अनुक्रमांक 4 हस्तलिखीत स्वरुपात नस्तीमध्ये आहे. यात Novel ऐवजी नामांकित कंपनी नमूद केले आहे. मात्र सदर शुध्दीपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द केलेचे आढळले नाही. त्यामुळे ब्रँडनेम कायम राहिले आहे व खरेदी देखील Novel याच ब्रँडची झाली आहे. त्यामुळे ई निविदा पध्दतीचा हेतू साध्य झाला नाही.

4) नमुना निविदा सोबतचे प्रपत्र “अ” Item Description A to G मधील a) 1 Year Warranty for top only (Carry in at service center) असे नमूद आहे. सदर वर्णन पाहता पुरवठादाराकडील अटीसारखे स्वरुप आहे. पुरवठादार 1 पेक्षा जास्त वर्षांची वॉरंटी व विस्तृत बाबींकरीता देणेची शक्यता असताना पंचायत समितीने स्वत:च सदरची बाब उध्दृत करणे वित्तीय औचित्यास धरुन नाही व पंचायत समितीच्या स्वनिधीस उपकारक नाही.

5) तीन प्राप्त निविदेसोबतची कागदपत्रे पडताळता सदरचे निविदाकार दुकाने संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणीकृत असल्याबाबत नमुना “ड” याची पडताळणी केली असता, निविदाकार क्रमांक 1 प्रियांका एंटरप्रायजेस यांचे चालक प्रमाणपत्र क्रमांक PN 208002 अन्वये पुष्पक रविकिरण शहा हे आहेत. तर क्रमांक 3 सिध्दांत ट्रेडींग कंपनी यांचे मालक प्रमाणक क्रमांक PN 0096401 अन्वये आर. एम. शहा हे आहेत. पुष्पक शहा यांचे पॅनकार्ड वर वडिलांचे नांव रविकिरण मोतीलाल शहा असे आहे तर क्रमांक 3 आर. एम. शहा यांचे पॅनकार्डवर स्वत:चे नांव रविकिरण मोतीलाल शहा असे आहे. यावरुन दोन्ही निविदाकरात पिता-पुत्रांचे नाते आहे. दोन्ही

निविदाकारांत परस्पर हितसंबंध नसलेबाबत खात्री केली नाही. याबाबत त्यांचे हमीपत्र घेतले नाही, अथवा प्रमाणित केलेले नाही.

6) ई-टेंडर प्रसिध्दी दिनांक 09/03/2016 नुसार बीड ओपनींग दिनांक 19/03/2016 असताना Bid evaluation Summary नुसार दिनांक 22/03/2016 रोजी ओपन केले. उशीराचे कारण नमूद नाही.

7) पुरवठादार सिध्दांत ट्रेडिंग कंपनी याने विक्री पश्चात सेवासुविधा देण्याचे त्याचे पत्र क्रमांक STC/KPS/SEW/NO40/2015-16 दिनांक 23/03/2016 अन्वये मान्य केले तथापि पंचायत समितीने याबाबत करारनामा केलेचे आढळले नाही. त्यामुळे पुरवठादार हमी कालावधीपासुन मुक्त राहिला आहे. सदर बाब गंभीर आहे. याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

Tender detail नुसार tender Creater Dy Engineer आहेत. मात्र टेंडर Inviting authority गटविकास अधिकारी पंचायत समिती, खंडाळा हे आहेत. व Bid committee Chairperson देखील गटविकास अधिकारी पंचायत समिती, खंडाळा हेच आहेत. त्यामुळे याबाबींवर शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत नियंत्रण ठेवणे गरजेचे होते.

**4.469 ग्रामीण भागातील मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणे.**

**पंचायत समिती कोरेगाव, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 18, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,19,340/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील परिच्छेद 2 नुसार ज्युडो कराटे व योगांचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र असलेल्या प्रशिक्षकांची निवड करण्यात येईल असे नमूद आहे. परंतु, सातारा जिल्हा कराटे ज्युडो असोसिएशन, नागठाणे या प्रशिक्षण संस्थेने ज्या प्रशिक्षकाद्वारे प्रशिक्षण दिलेले आहे, त्या प्रशिक्षकाची प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदर प्रशिक्षक प्रशिक्षण देण्यासाठी पात्र होते किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

2) ई-निविदा प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावर केलेली असल्याने पंचायत समितीने पुनर्प्रत्यायी आदेश प्राप्त होण्यासाठी महिला बालकल्याण विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) यांनी दिनांक 10/2/2016 रोजी पुनर्प्रत्यायी आदेशास मंजूरी दिलेली आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस/2014/प्र.क्र.82/भाग 111/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.3.2 नुसार पुनर्प्रत्यायी आदेश हे खरेदी संदर्भात आहेत. सदर योजना ही प्रशिक्षणाशी संबंधित असतांना पंचायत समितीने प्रशिक्षणासाठी पुनर्प्रत्यायी आदेश कसे दिले? जिल्हा परिषद स्तरावर महिला व बालकल्याण विभागाने ई- निविदा प्रक्रियेव्दारे सदर योजना राबविली होती. सदर बाबतची नस्ती किंवा आवश्यक कागदपत्रे पंचायत समिती स्तरावर उपलब्ध नसल्याने सक्षम संस्थेची निवड झाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3) संबंधित प्रशिक्षण संस्थेस पंचायत समितीने प्रशिक्षण सुरु करण्यासाठी दिनांक 11/02/2016 रोजी आदेश दिलेले आहेत. नस्तीसोबत असलेल्या हजेरीपत्रकावर प्रशिक्षण कालावधी दिनांक 11/02/2016 ते दिनांक 31/03/2016 असा नमूद करण्यात आला आहे. परंतू, 8 शाळांनी इतर दिनांकास प्रशिक्षण सुरु करण्यासंदर्भात गटविकास अधिकारी यांना परवानगी संदर्भात पत्र दिलेले आहे.

सदर शाळांचे प्रशिक्षण ही दिनांक 11/02/2016 रोजी सुरु केल्याचे हजेरीपत्रकावर नमूद करण्यात आलेले आहे. परंतू, संबंधित शाळांना प्रशिक्षणासाठी परवानगी नसतांनाही हजेरीपत्रके तयार करुन रक्कम अदा केलेली आहे. दिनांक 11/02/2016 ते परवानगी मागितलेल्या दिनांकापर्यंतच्या रुपये14,164/- तासांचे प्रति तास रुपये 3.11 प्रमाणे रुपये 44,050/- संबंधितांकडून वसूल करावेत.

4) पंचायत समितीने दिनांक 31/10/2015 रोजी सदर योजनेसाठी 17 शाळेतील 740 विद्यार्थ्यांची निवड केली होती. तथापि, त्यावेळी पंचायत समितीने प्रशिक्षण सुरु करण्यासंदर्भात संबंधित संस्थेस आदेश दिलेले नव्हते. योजनेची सर्व रक्कम दिनांक 31/03/2016 पर्यंत खर्च करण्याच्या उद्देशानेच जादा शाळांची व जादा विद्यार्थ्यांची

निवड केलेली आहे. (22 शाळा व 1414 विद्यार्थी) असे लेखापरीक्षणाचे मत आहे. 22 शाळांतील 1414 विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी दिनांक 11/02/2016 ते दिनांक 30/03/2016 अखेर प्रशिक्षणास अनुपस्थित नसल्याचे हजेरीपत्रकावरुन दिसून येते. सदर हजेरीपत्रकांची खातरजमा करुन सर्व विद्यार्थी दिनांक 11/02/2016 ते दिनांक 30/03/2016 या कालावधीतील सार्वजनिक सुट्टी, रविवार इत्यादी दिवशी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्याबाबत पंचायत समितीने खात्री करावी व त्याबाबत पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

**4.470 महिला बालकल्याण विभागामार्फत खेळणी खरेदी करुन अंगणवाड्यांना पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती तासगांव, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,75,080/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक- भाखस2014/प्रक्र.82 भाग 111/उद्योग- 4, दिनांक 30/10/2015 च्या शासकीय विभागांनी करावयाच्या खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची नियम पुस्तका मधील परिशिष्ठ-17 मधील बाब क्रमांक 65 मध्ये अंगणवाडीसाठी घ्यावयाचे क्रीडा साहित्य खरेदी हि बाब कारागृहातर्फे तयार केल्या जाणाऱ्या वस्तू यासाठी राखीव असताना अंगणवाडी साठी निविदा मार्फत खरेदी नियम बाह्य ठरते.

2) प्राप्त झालेल्या 4 निविदेमध्ये न्यू साई फायबर यांचे 3 बाबींसाठी दर कमी होते. तर प्रणोती एंटरप्राईझेस यांचे दर 2 बाबी साठी कमी होते. असे असताना पुरवठा आदेश विभागून देणे आवश्यक असताना एकूण 5 प्रकारच्या खेळणीचा पुरवठा आदेश न्यू साई फायबर - मिरज यांना दिल्यामुळे पुरवठादारास रक्कम रुपये 11,832/- अति प्रदान झालेले आहे. तरी अतिप्रदान रक्कम रुपये 11,832/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

**4.471 10 टक्के महिला व बालकल्याण सेस अनुदानामधुन महिलांना शिलाई मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती जत, उपकर निधीच्या 10 टक्के महिला व बालकल्याण निधीतून सन 2015-2016 या आर्थिक वर्षाकरीता पंचायत समिती जत कार्यक्षेत्रातील महिलांना शिलाई मशीन पुरवठा करणेकामी जाहिर कोटेशन नोटीस सन 2015-16 दिनांक 03/02/2016 रोजी देवून निविदा मागवून प्राप्त निविदामधून कमी दराची निविदा सुनिल ट्रेडर्स, जत यांची स्वीकारून शिलाई मशीन खरेदी केली आहे. खरेदीपोटी पुरवठादारास रक्कम रूपये 2,48,640/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस -1088/2512/उदयोग 6, दिनांक 02/01/1992 मधील मार्गदर्शक तत्वानुसार मान्यताप्राप्त शासकीय संस्था किंवा पुरवठादाराकडून शिलाई मशीन खरेदी करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केली नाही, तरी केलेली खरेदी शासन दरकरारातील दराप्रमाणेच रास्त दराने केलेबाबत खात्री पटवावी.

2) पंचायत समिती जत यांनी उपकर निधीतून आपल्या अधिनस्त समाजकल्याण व महिला व बालकल्याण विभागासाठी एकाच पुरवठादाराकडून अनुक्रमे 53 नग व 44 नग शिलाई मशीन असे एकूण 97 नग शिलाई मशीन खरेदी केले आहे. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र. 82/भाग -111/ /उदयोग-4, दिनांक 30/10/2015 तरतुदीप्रमाणे अधिनस्त विभागांची खरेदीची आवश्यकता विचारात घेऊन खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ई- निविदा पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यवाही केली नाही.

3) आयकर अधिनियम 194 सी प्रमाणे पुरवठादारास देय रक्कमेतून 2 टक्के टीडीएस रक्कम रूपये 4,972/- कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. तरी सदर रक्कम रूपये 4,972/- संबंधितांकडून वसुल करून शासन सदरी भरणा करावी.

4) पुरवठादारास शिलाई मशीन प्रति नग रक्कम रूपये 5,600/- प्रमाणे 44 नगापोटी रक्कम रूपये 2,46,400/- प्रदान करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 2,48,640/- प्रदान केल्याने रक्कम रूपये 2,240/- चे अतिप्रदान झाले आहे. अतिप्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसूल करून पुर्तता करावी.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीपीआर/1088/सी आर/786, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात ते वाटप करणे आवश्यक आहे. परंतु पुढील वित्तीय वर्षात शिलाई मशीन वाटप करण्यात आले आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थी निवड प्रक्रिया तथा मान्यता ही सर्वसाधारण सभेत करणे आवश्यक असता तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार वाटप साहित्याची पर्यवेक्षण यंत्रणेमार्फत खात्री करून लाभार्थीचा आर्थिक स्थिती अहवाल सादर करावयाचा आहे. सदर अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

8) विभागाने पुरवठादाबरोबर रूपये 100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा लिहून घेतलेला नाही.

9) तालुकास्तरीय गावनिहाय लाभार्थी मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

**4.472 शिलाई मशीन खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती वाळवा-ईस्लामपूर, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 13, दिनांक 14/01/2016 अन्वये रक्कम रुपये 4,19,818/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना वेळापत्रकाप्रमाणे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-200/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार राबवण्यात आली नाही.

2) दरास मंजुरी घेतले बाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती, वाळवा यांची स्वाक्षरी नाही.

3) लखोटे प्राप्त नंतरची तारीख दरपत्रकावर कशी नोंदविली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

4) खरेदी केलेले साहित्य ज्या त्या वर्षात वाटप होणे आवश्यक असताना लाभार्थ्यांना सन 2015-16 मध्ये वाटप न करता सन 2016-2017 मध्ये वाटप केले आहे. त्यामुळे अनिमितता झाली आहे.

5) लाभार्थी मंजुरीचा पंचायत समितीचा ठराव नसल्याने लाभार्थी निवडीस पंचायत समिती मंजुरी घेतल्याचे दिसून येत नाही.

6) लाभार्थी हिस्सा वसूल केल्याबाबत लाभार्थीला पोहोच पावती दिल्याचे दप्तरी उपलब्ध झाले नाही.

7) पुरवठाधारकाचा करारनामा उपलब्ध झाला नाही.

8) 7 लाभार्थीचे निवड यादीत नावे समाविष्ठ नसताना त्यांना लाभ दिल्याचे दिसून येते खुलासा करावा.

9) शोभा मनोहर कोळी रा. कापूसखेड यांचे वस्तू प्राप्त झाल्याबद्दल स्वाक्षरी नाही. त्यामुळे लाभ दिल्याबाबत खात्री करता येत नाही.

**4.473 पंचायत समिती सेस मधून सायकल खरेदी वाटप खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती पलूसचे सन 2015-2016 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करताना पंचायत समिती सेस मधून सायकल खरेदी करून वाटप करणेची योजना राबिविली असून त्यासाठी प्रमाणक क्रमांक 11, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,01,400/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राप्त लाखोटा वरील तारीख 10/03/2015 व 11/03/2015 अशी आहे. यावरून सन 2014-15 मधील प्राप्त लखोटे जोडल्याचे दिसून येते.

2) एकूण 53 सायकली पैकी फक्त 32 सायकलींचे वाटप 31/03/2016 पर्यंत झाले आहे. उर्वरित 21 सायकलींचे वाटप सन 2016-17 मध्ये झालेले आहे.

3) लाभार्थीचे अर्जासोबतची कागदपत्रे पहाता ती सन 2016-17 मधील असल्याचे दिसून आले. यावरून लाभार्थी निवड खरेदी पूर्वी न करताच खरेदी केल्याचे दिसून येते.

4) पंचायत समिती ठराव नुसार लाभार्थी निवडीस मंजुरी घ्यावी असे नमूद केले आहे. परंतु लाभार्थी निवडीस पंचायत समितीची मंजुरी घेतलेली नाही.

5) सदर योजना वेळापत्रकाप्रमाणे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 9 वित्त/प्र.क्र.446/2008, दिनांक 20/06/2008 नुसार राबविण्यात आली नाही.

6) चढ्ढा यांचेशी केलेला करारनामा हा जुलै 2016 मधील आहे. त्यामुळे सायकली दिनांक 31/03/2016 रोजी प्राप्त झाल्याचे लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

7) चाचणी अहवाल नाही.

8) क्रेडीट मेमोवर रक्कम आदा केली आहे. त्याचे tax ईनव्हाईस उपलब्ध झाले नाही.

9) आयकर भरणा चलन उपलब्ध झाले नाही.

**4.474 पिकोफॉल मशिन खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कडेगांव, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती कडेगावचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना महिला व बाल कल्याण विभागाने पंचायत समिती सेस मधुन पिको फॉल मशिन खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 2, दिनांक 31/03/2016 अन्वये रककम् रुपये 68,850/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/33/प्रक्र/146/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रक निश्चित केले आहे. सदर प्रमाणे कार्यवाही करण्यात झालेली नाही.

2) लाभार्थी निवडीचा ठराव व लाभार्थी मंजूर यादी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) पुरवठा आदेश मधील अट क्रमांक 1 नुसार पुरवठादाराकडुन रक्कम रुपये 100/- स्टॅंप पेपरवर करारनामा करणेबाबत नमूद केलेले आहे. सदरचा करारनामा लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

4) पुरवठा आदेश मधील अट क्रमांक 12 नुसार साहित्य तपासणी अहवाल सादर केलेनंतर पुरवठादारास रक्कम आदा करणेबाबत नमूद आहे. सदरचा तपासणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

5) गावनिहाय लाभार्थी निहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सबब लाभार्थ्याने यापूर्वी लाभ न घेतल्याचे किंवा दुबार लाभ न झाल्याची खात्री होत नाही.

**4.475 ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवणयंत्र पुरवणे.**

**पंचायत समिती करवीर, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 44) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 30, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,73,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त 3, दिनांक 20/06/2008 नुसार वैयाक्तिक लाभाच्या योजना काटेकोरपणे राबविणेबाबत परिशिष्ठ ई मध्ये वेळापत्रक दिलेले आहे. त्यानुसार योजना राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/1088/सीआर/786, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. ते त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. तथापि लेखापरीक्षण कालावधी अखेर 16 शिवणयंत्र शिल्लक आहेत. त्यामुळे प्रती नग त्यामुळे 4500 प्रमाणे एकूण 72,000/- एवढी रक्कम नाहक गुंतून पडलेली आहे.

3) लाभार्थी हिस्सा 10 टक्के प्रमाणे 194 लाभार्थीचे 450 प्रमाणे एकूण रुपये 87,300/- भरणे आवश्यक असताना रुपये 71,550/- एवढाच लाभार्थी हिस्सा भरला आहे. पण देयक मात्र 194 लाभार्थीचे 4500 प्रमाणे रुपये 8,73,000/- एवढी पूर्ण रक्कम अदा केली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 15,750/- एवढा लाभार्थी हिस्सा शासन निधीमधून सदर कंपनीस अदा झाला आहे. त्यामुळे रुपये 15,750/- एवढी रक्कम वसूल करणेचे आहे.

4) शासन निर्णय, उद्योग, अन्न व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक सारवस-2014/प्र.क्र.भाग 3/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 2.9.3 अन्वये सदर खरेदी करत असताना खरेदी समिती स्थापन करणेबाबत सूचित केले आहे. पण तशी कृति झालेली नाही.

5) शासन निर्णय, उद्योग, अन्न व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक सारवस-2014/प्र.क्र.भाग 3/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील परिशिष्ठ 8 नुसार निविदा धारकांनी 5 लाखाच्या वरील निविदासाठी टेंडर फी रुपये 2,000/- प्रमाणे भरणे आवश्यक असताना 4 निविदाधारकांनी फी रुपये 1,000/- प्रमाणे भरली आहे. तरी निविदाधारकांची टेंडर फी रुपये 1,000/- प्रमाणे एकूण रुपये 4,000/- वसूल करणेत यावी.

**4.476 सर्वसाधारण घटकातील इयत्ता 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण देणेमधील अनियमितता.**

**पंचायत समिती चंदगड, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती चंदगडचे सन 2015-16 च्या लेखापरीक्षण दरम्यान महिला बाल कल्याण विभागांतर्गत सर्वसाधारण घटकातील इयत्ता 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT व समकक्ष अभ्यासक्रम- डाटा एंन्ट्री/ टॅली इ.) च्या नस्तीमध्ये लाभार्थी प्रस्ताव तपासण्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील नमूद योजना क्रमांक 4 नुसार महीला व बाल कल्याण विभागामार्फत उपकर निधीतून सर्वसाधारण घटकातील इयत्ता 7 वी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत अंतर्गत योजनेमधून लाभार्थींना 3,000/- प्रमाणे लाभ देण्यात आलेला आहे. तथापि संगणक प्रशिक्षण देणा-या नोंदणीकृत संस्थेमार्फत संगणक प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे व त्यासाठी लाभार्थी प्रशिक्षणार्थीचे यादी संबंधित संस्थेला देऊन त्या संस्थेमार्फत प्रशिक्षण घेऊन ज्या त्या वित्तीय वर्षात संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी वरीलप्रमाणे संगणक प्रशिक्षण अनुदान लाभार्थींना वाटप न करता प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला अदा करणे आवश्यक होते. तथापि तसे करण्यात आलेले नाही.

2) कु. तेजस्विनी संतोष गावडे, रा. उमगांव- सदर लाभार्थी सन 2015-16 या आर्थिक वर्षात इयत्ता 7 वी ते 12 वी उत्तीर्ण नसुन इयत्ता 10 वी सन 2001 साली झालेली असून सदर लाभार्थ्यांना देण्यात आलेला लाभ रूपये 3,000/- वसुल करणेत यावा तसेच संपूर्ण प्राप्त 16 प्रस्तावापैकी फक्त 4 लाभार्थीचे बँक पासबुक झेरॉक्स जोडलेले आहे. उर्वरीत 12 अप्राप्त आहेत. तसेच ग्रामपंचायत ठराव व इतर दाखले उपल्बध नाहीत. तसेच एकाही प्रस्तावावर बालविकास प्रकल्प अधिकारी, चंदगड यांची स्वाक्षरी नाही. तसेच स्टॅपवर करारपत्र केलेले दिसून येत नाही.

3) 42 लाभार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव उपलब्ध नसलेने सदर लाभार्थ्यांना देण्यात आलेला लाभ प्रत्येकी रूपये 3,000/- प्रमाणे एकूण 42 लाभार्थ्यांचे रक्कम रूपये 1,26,000/- लेखापरीक्षणात वसुलपात्र करण्यात येत आहे.

**4.477 10 टक्के महिला व बालकल्याण विभागांतर्गत ग्रामीण भागातील मुलींना सायकल खरेदी व वाटपाबाबत.**

**पंचायत समिती दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांचेकडील सन 2015-2016 या लेखापरीक्षण कालावधीत पंचायत समिती उपकर निधी मधून ग्रामीण भागातील मुलींना सायकल पुरवठा करणेकरीता 10 टक्के महिला व बालकल्याण या लेखाशिर्षातंर्गत प्रमाणक क्रमांक 12, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,25,970/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबवितांना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए- 2008/प्र.क्र.446/वित्त-09, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समितीने राबविलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना नमूद केलेल्या असून त्यासोबत परिशिष्ठ क्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनामधील लाभार्थ्यांची निवड तसेच जुलै अखेर होणे आवश्यक आहे. तसेच 30 नोव्हेंबर अखेर साहित्य खरेदी कामी पुरवठा आदेश देऊन साहित्य वाटप जानेवारी अखेर पूर्ण करून पुरवठादाराचे देयक माहे फेब्रुवारी मध्ये अदा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तिक लाभ देण्यांत आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे एकाच कुटूंबातील एकापेक्षा अनेक व्यक्तींना म्हणजेच दुबार लाभ दिला गेला नसलेबाबतची तपासणी करता आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर-1088/सीआर-786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले. त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता पंचायत समितीने सदर साहित्याचे वाटप पुढील आर्थिक वर्ष सन 2016-2017 मध्ये दिनांक 03/06/2016 अखेर 33 नग सायकलींचे वाटप करण्यात आलेले आहे. म्हणजेच सन 2015-2016 मध्ये साहित्याचे वाटप न केल्याने सदर आर्थिक वर्षामध्ये लाभार्थ्याना सदर योजनेचा लाभ न मिळाल्याने सदर योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर-1088/सीआर-786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले. त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करतां पंचायत समितीने सदर साहित्याचे वाटप पुढील आर्थिक वर्ष सन 2016-2017 मध्ये दिनांक 03/06/2016 अखेर एकूण 39 नगांपैकी 33 नग सायकलींचे वाटप केलेले आहे. व उर्वरित 06 नग सायकली लेखापरीक्षण कालावधी अखेर वाटपा विना शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे प्रती नग रुपये 3,230/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 19,380/- नाहक गुंतून पडलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम आज अखेरचे व्याजासह वसुल करुन पंचायत समिती उपकर निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

5) सर्व लाभार्थ्यांच्या मागणी प्रस्तावावर मा. गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तरी प्रस्तावास मंजूरी नसताना संबंधीत लाभार्थ्यांना सायकलींचे कशाचे आधारे वाटप करण्यात आले.

6) पुरवठा झालेल्या सायकली हया आयएसआय मार्कच्या असल्याबाबत व सदरच्या सायकली पुरवठा आदेशाप्रमाणे पंचायत समिती स्तरावर संबंधित सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.478 अंगणवाडी बांधकामाबाबत.**

**पंचायत समिती चिखलधरा, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 35) -** अंगणवाडी इमारत बांधकाम योजनेअंतर्गत रक्कम रुपये 1,01,79,147/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत बारुगव्हाण येथील अंगणवाडी बांधकामावर रुपये 6,12,390/- खर्च झालेले असुन सदर बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतु सदर बांधकामाचे कामाचे आदेश देण्यात आले नसून फोटो सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

2) ग्रामपंचायत खटकाली अंतर्गत गाव आहाड येथे अंगणवाडी बांधकामावर रुपये 6,59,074/- खर्च करण्यात आले असुन सदर बांधकाम पूर्ण झाल्याचे आढळते. परंतु कामाचे आदेश नाहीत तसेच बांधकामाचा कंत्राट कोणत्या कंत्राटदाराला देण्यात आला ? तसेच ई-टेंडरींग केल्याबाबत कागदपत्रांची नस्ती उपलब्ध झाली नाही.

कंत्राटदारासोबत रुपये 100/- च्या स्टँप पेपरवर करारनामा केला नाही, कंत्राटदाराकडून अनामत रक्कम जमा केली नाही.

3) ग्रामपंचायत कोहाना अंतर्गत गांव बिहाली येथे अंगणवाडी बांधकाम पुर्ण करण्यात आले यावर रुपये 6,54,789/- खर्च करण्यात आले परंतु कंत्राटदारांचे आवश्यक कागदपत्रे असलेली फाईल उदा. आयकर भरणा करीत असल्याबाबत आयकर विवरण, वॅट नोंदणीप्रमाणपत्र, कंत्राटदाराची नोंदणी झाल्याबाबत प्रमाणपत्र सादर केले नाही तसेच कंत्राटदाराने डिपॉझिट रक्कम ठेवलेली नाही, रॉयल्टी भरणा केल्याबाबत रॉयल्टीच्या पावत्या नाहीत.

4) ग्रामपंचायत वस्तापूर येथे अंगणवाडी बांधकामावर रुपये 6,04,289/- खर्च करण्यात आले तसेच ग्रामपंचायत भुलोरी अंतर्गत घटांग येथे अंगणवाडी बांधकामावर रुपये 6,44,700/- खर्च करण्यात आले परतु सदर

कामांच्या कंत्राट दिल्याबाबतच्या नस्त्या उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत त्यामुळे निविदा कोणत्या पेपरमध्ये देण्यात आली ? कोणत्या तारखेला दिली ? एकूण किती कंत्राटदारांनी ई-निविदा भरणा केल्या ? त्यापैकी कोणत्या कंत्राटदाराची निविदा मंजूर करण्यात आली? कंत्राटदार नोंदणीकृत होते किंवा कसे ? याबाबत नस्ती उपलब्ध नसल्यामुळे पडताळणी करता आली नाही. कंत्राटदारासोबत करारनामा करण्यात आलेला नाही.

5) सदर अंगणवाडी बांधकामांचे रुपये 1,55,60,949/- शिल्लक आहे. परंतु सदर अनुदान शासनखाती भरणा केली नाही सदर अनुदान शासनखाती भरणा करुन अनुपालन सादर करावे.

**4.479 पंचायत समिती सेस फंडातून महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांना 75 टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणेबाबत खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती धामणगाव रेल्वे यांनी पंचायत समिती उपकरातुन सन 2015-2016 मध्ये सुधारीत अंदाजपत्रकात 20 संकीर्ण महिला व बालकल्याण या लेखाशिर्षातंर्गत मागासवर्गीय महिलांना 90 टक्के अनुदानावर पायाने चालविणारी शिलाई मशिन पुरविणेकरीता 1,94,460/- खर्च करण्यांत आलेला असुन सदर प्रदान मे. अर्णव सप्लायर्स,सांगली यांना प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती ठराव क्रमांक 3/1, दिनांक 05/02/2016 अन्वये पारीत झालेल्या ठरावामधे महिला व बालकल्याण अंतर्गत महिलांना 75 टक्के अनुदानावर शिलाई मशीन वाटप योजनेस मंजूरी प्रदान केली आहे परंतु कार्यालयाने 90 टक्के अनुदानाचा लाभ दिल्याचे आढळले 15 टक्के जादा झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चीत करण्यात यावी.

2) योजनेस प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु याबाबत गटविकास अधिकारी याचे विना क्रमांक व विना दिनांकाचे आदेश नस्तीत आढळले.

3) अंदाजपत्रकाध्ये रुपये 50,000/- ची तरतुद केलेली आहे. परंतु दिनांक 26/11/2015 चे जाहीराती मध्ये 80,000/- तरतुद दर्शविले आहे. विसंगतीबाबत खुलासा करावा.

4) जाहिरातीमध्ये सिलबंद निविदा मागाविण्यात आलेल्या आहेत, परंतु कोणतीही निविदा सिलबंद असल्याचे आढळून आले नाही.

5) शिलाई मशीन चांगल्या प्रतीत प्राप्त झाल्याबाबत पंचायत समिती सदस्य व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचा प्रत्यक्ष पाहणी पडताळणी चाचणी अहवाल दप्तरी आढळुन आलेला नाही. त्यामुळे योग्य दर्जाचे व स्पेशिफीकेशन प्रमाणे साहित्य प्राप्त झाले याची खात्री पटत नाही.

6) प्राप्त झालेल्या अर्णव सप्लायर्स, पार्थव एजन्सी सोलूशन व परीक्षीत ॲग्रो टेक्नॉक्स यांचे कोटेशन वर नोंदणी क्रमांक, व्हॅट क्रमांक आढळून आलेला नाही. तसेच परीक्षीत ॲग्रो टेक्नॉक्स यांचे कृषि साहित्याशी संबंधीत फर्म असल्यामुळे शिलाई मशीनचे कोटेशन कसे सादर केले तसेच प्राप्त झालेले सर्व कोटेशनवर कार्यालयाचा एकच आवक क्रमांक 9799, दिनांक 11/12/2015 नोदविलेला आहे. परंतु प्रत्यक्षात आवक नोंदवहीची तपासणी केली असता सदर दिनाकांस व आवक क्रमांकावर MAIDC चे पत्राची आवक नोंद झाली असून सदर कोटेशनची नोंद नाही. त्यामुळे सर्व कोटेशन एकाच व्यक्तीने आणले असून पंचायत समितीला स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला दिसत नाही. याबाबत गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भां.ख.स.2014/प्र.क्र./82/भाग-III/उदयोग 4, दिनांक 30/10/2015 अन्वये निविदा समिती स्थापन करणे आवश्यक असतांना करण्यात आलेली नाही.

8) मे. अर्णव सप्लायर्स, सांगली यांना प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये 68,328/-+1,15,632/-=1,83,960/- मधुन 2 टक्के आयकर रुपये 3,680/- व विक्रिकर आयुक्त मुंबई यांचे राजपत्र असाधारण क्रमांक 22 दिनांक 04/04/2012 अन्वये 5 टक्के वॅट रक्कम रुपये 9,198/- वसुल केली नाही. एकुण रक्कम रुपये 12,878/-

शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे. तसेच जाहीरातीतील अटी व शर्तीनुसार 3टक्के सुरक्षाठेव रुपये 5,519/- घेण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.466/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट-ई नुसार योजना राबवितांना लाभार्थी अर्ज घेवून नंतर पंचायत समितीची मान्यता घेवून लाभार्थी निवड करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही. लाभार्थ्याचे अर्ज नसतांना पुरवठा आदेश कशाचे आधारे दिला याबाबत खुलासा करावा.

10) सुधारीत अंदाजपत्रकात रुपये 50,000/- ची तरतुद असतांना रुपये 1,94,460/- खर्च केलेला आहे रुपये 1,44,460/- जादा खर्च करुन वित्तीय अनियमितता केलेली आहे. रुपये 1,44,460/- खर्च मान्य करता येत नाही.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पिआरसी/1089/प्रक्र.55, दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अगोदरपासुन मास्टर नोंदवही नसल्यामुळे योजनेचा दुबारा लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री करता आलेली नाही. योजनेची अनुशेष नोंदवही ठेवली नाही. अघावत करुन अनुपालन दर्शवावे.

12) नियमाप्रमाणे लाभार्थी हिस्सा दिनांक 31/03/2016 पुर्वी भरणा करणे आवश्यक असतांना एकाही लाभार्थ्यांनी 31/03/2016 पर्यंत भरणा केलेला नाही. लाभार्थी हिस्सा न घेताच शिलाई मशिन वाटप करण्यात आल्या.

13) प्राप्त शिलाई मशीन नग 13 ची नोंद साठा पंजी पान क्रमांक 23 वर दिनांक 10/03/2016 रोजी घेण्यात आलेली आहे. तसेच 22 नग शिलाई मशीनची नोंद साठा पंजी पान क्रमांक 30 वर घेण्यात आलेली आहे. एकूण 35 शिलाई मशीन पैकी दिनांक 31/03/2016 अखेर एकही वाटप करण्यात आलेली नाही. तसेच लेखापरीक्षण दिनांकापर्यंत एकूण 06 शिलाई मशीन वाटपाअभावी शिल्लक असल्याचे आढळले. त्याच वित्तीय वर्षात लाभ देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

14) लाभार्थ्याच्या अर्जाची तपासणी केली असता त्रुटी आढळून आल्यात. (उदा.शिवणकला प्रमाणपत्र संशयित आहे. अर्जावर लाभार्थ्याचा फोटो लावण्यात आला नाही.)

सदर लाभामुळे लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्याच्या आर्थिक उत्पन्नामध्ये किती भर पडली. याबाबत फलश्रुती अहवाल सादर करुन अनुपालन दर्शवावे.

**4.480 किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर, आरोग्य, कुटूंबनियोजन व कायदेविषयक प्रशिक्षणावर केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती अकोला, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,83,520/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-16 या वित्तीय वर्षात महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत 10 टक्के जिल्हा परिषद उपकरातून किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर, आरोग्य, कुंटुबनियोजन व कायदेविषयक दिनांक 20/03/2016 ते दिनांक 21/03/2016 या दरम्यान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक तालुकास्तरावर एकात्मिक बालविकास व महिला यांचे कार्यालयात 19 कर्मचारी कार्यरत असतांना शासन निर्णय ग्रामविकास विभाग झेडपीए-2013/प्र.क्र.76/परा-1, दिनांक 24/01/2014 नुसार महिला व बालविकास कार्यालयातील अंगणवाडी पर्यावेक्षिका विधी तज्ञ व्यख्याता, अनुभवी व संवेदनशिल तज्ञ यांचे मार्फत प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक होते. या कार्यक्रमाकरिता स्वंयसेवी सस्थेकडून चहाचे, जेवणाचे प्रशिक्षण किट व सभागृहाचे दर मागविण्यात आले होते. त्याकरिता चार संस्थेचे दर प्राप्त झाले. चार पैकी दोन संस्था गजानन महाराज बहुउद्देशिय शिक्षण संस्था व कमलाबाई देशमुख सेवाभावी बहुउद्देशीय संस्था या दोन्ही संस्थेच्या वतीने श्रीराजेश दिनकराव देशमुख यांनी निविदेत भाग घेतला. दोन्ही संस्थेचे पत्ते विजय कॉलनी असे असुन मात्र गावाचे नावे वेगवेगळे आहेत. त्यामुळे संस्थेच्या नोंदणी बाबत शंका आहे.

2) नोंदवही नुसार विविध भागातून दिनांक 20/03/2016 रोजी 321 व दिनांक 21/03/2016 रोजी 299 अशी 620 प्रशिक्षाणाथी हजर असल्याचे नमुद आहे. ज्या उद्देशाकरिता अनुदान दिले त्या तज्ञ व्याख्यात्यांवर खर्च झाला नसुन केवळ अनावश्यक बाबीवर जास्त खर्च केल्याचे संस्थेने सादर केलेल्या देयकावरुन निदर्शनास आले.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणाच्या किटमध्ये वाचन साहित्य, लेटरपॅड, पेन, फोल्डर व अभिप्राय नोंदविणे याकरिता प्रपत्राचे वाटप करणे आवश्यक असतांना तसे वाटप केले नसल्याचे निदर्शनास आले. प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणाच्या किटवर खर्च कल्याचे दर्शवून रुपये 36,580/- चे नियमबाहयरित्या संस्थेला प्रदान करण्यात आले, त्यामुळे संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी. सेवा पुरविणा-या पुरवठादारा कडून 12.5 टक्के सेवा कर रुपये 22,940/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केली नाही.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार सभागृह उपलब्ध नसल्यास भाड्याने घेणे बाबत सुचित असतांना सभागृह उपलब्ध नसल्याबाबत कोणताही पुरावा जोडला नाही. त्यामुळे सभागृहावर विनाकरण रुपये 45,860/- खर्च झाला.

5) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार सदर योजना राबविण्याकरिता प्रशिणार्थीच्या संख्यानुसार तीन ते पाच दिवस प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक असतांना ते दोन दिवस घेतल्याचे निदर्शनास आले.

6) सदर प्रशिक्षणाला स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्यांना आमंत्रित करणे आवश्यक असतांना त्याकरिता कोणत्या सदस्याला आमंत्रित केले याचा उल्लेख आढळला नाही.

7) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार प्रशिक्षणाचे प्रशिक्षणानिहाय फोटो काढणे आवश्यक असतांना मोघम स्वरुपात प्रशिक्षणार्थीचे फोटो सादर केले.

8) तज्ञाचे दरोरोज वेगवेगळया विषयावर पाच तास व्यारव्याने घेणे आवश्यक असतांना तासीके प्रमाणे नोंदवही ठेवलेली नाही. दोन्ही प्रशिक्षणाच्या खर्चाची वेगवेगळी तरतुद असतांना एकाच प्रशिक्षणात दोन्हीचे प्रशिक्षण घेऊन एका प्रशिक्षणावरील खर्चाचे अनावश्यक प्रदान करण्यात आले.

9) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणाच्या किटमध्ये अभिप्राय नोंदविणे याकरिता प्रपत्राचे वाटप करावयाचे होते, तसे प्रपत्र नस्तीत आढळले नाही.

**4.481 किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर, आरोग्य कुटूंबनियोतन व कायदेविषयक प्रशिक्षण देणेबाबत खर्चातील अनियमिता.**

**पंचायत समिती बार्शिटाकळी, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** प्रमाणक क्रमांक 28, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 79,835/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) किशोरवयीन मुलीना व महिलांना जेंडर, आरोग्य कुंटूब नियोजन व कायदेविषयक प्रशिक्षण रुपये 80,000/- तरतुद असून सदर योजनाकरीता प्रशासकीय मान्यता व तांत्रिक्र मान्यता संबंधी कोणतेही अभिलेखे नस्तीमध्ये लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदर योजनाबाबत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेता खर्च केलेला दिसून येत आहे.

2) किशोरवयीन मुलीना व महिलांना जेंडर, आरोग्य कुंटूब नियोजन व कायदेविषयक प्रशिक्षण पंचायत समितीच्या एकात्मिक व बालविकास विभागामार्फत जिल्हा परिषद उपकरातून सदर योजना दिनांक 21/03/2016 व 22/03/2016 या कालावधीत राबविण्यात आली असून तीच योजना पंचायत समिती उपकरातून राबविण्यात आली आहे. त्यामुळे एकच योजना दोन्ही निधीतून राबविण्यात आली आहे.

3) एकात्मिक व बालविकास विभागाने सदर योजना राबवितांना निविदा प्रक्रीया राबवलेली असून सदर निविदा श्रीमती कमलाबाई देशमूख सेवाभावी बहू उद्देशीय संस्था या सर्वात कमी दराने सादर केलेल्या संस्थेस कंत्राट

देवून योजनेवरील खर्च केलेला आहे. परंतु पंचायत समिती उपकरातून योजना राबवितांना पंचायत समितीने निविदा प्रकीया राबवलेली नाही. तसेच सदर योजनेवरील सर्व खर्च श्री.व्ही.एम.चव्हाण, वरिष्ठ सहायक यांनी प्रशिक्षणाचा खर्चातील रक्कमा अदा केल्या असून नंतर त्याच्या नावे देयकाची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे सदर योजनेवरील खर्च करतांना वित्तीय औचित्याचा भंग झाला आहे.

4) योजना पंचायत समितीस्तरावर राबवितांना प्रशिक्षणसाठी मार्गदर्शन विषय निश्चित करणे आवश्यक होते. परंतु अशाप्रकारे प्रशिक्षणाचे विषयी कोणतेही नियोजन केलेले दिसून येत नाही. तसेच सदर योजना तीन टप्प्यात राबविण्यात आली असून सदर योजना संदर्भात जाहिरात किंवा प्रचार व प्रसिध्दी केल्याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणात नस्ती मध्ये आढळले नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षणाची माहिती सर्व लाभार्थीना कळविले किंवा कसे ? याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

5) सदर प्रशिक्षण दिनांक 08/03/2016 रोजी काजळेश्वर, दिनांक 31/03/2016 रोजी पंचायत समिती व दिनांक 31/03/2016 रोजी तिवसा येथे आयोजित केले असून सदर प्रशिक्षणास किती लाभार्थी उपस्थित होते. याबाबत उपस्थिती रजिस्टर व सदर प्रशिक्षणाचे फोटो लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षणास किती लाभार्थी उपस्थित होते त्याच्यावर केलेल्या खर्चाबाबत सत्यता पडताळता आली नाही.

**4.482 अंगणवाडी व बालवाडीमध्ये काम करणाऱ्या सेविका / मदतनीस / पर्यवेक्षीका यांचे प्रशिणातील अनियमितता.**

**पंचायत समिती पातूर, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,16,100/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/परा-1, दिनांक 24/01/2014 नुसार महिला व बालविकास कार्यालयातील अंगणवाडी पर्यावेक्षिका विधी तज्ञ व्यख्याता, अनुभवी व संवेदनशिल तज्ञ यांचेमार्फत प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक होते.

2) या कार्यक्रमाकरिता स्वंयसेवी संस्थे कडून चहाचे, जेवणाचे प्रशिक्षण किट व सभागृहाचे दर मागविण्यात आले होते. त्याकरिता चार संस्थेचे दर प्राप्त झाले. चार पैकी गजानन महाराज बहुउद्देशिय शिक्षण संस्था व कमलाबाई देशमुख बहुउद्देशीय संस्था या दोन्ही संस्थेचे अध्यक्ष श्री.राजेश दिनकराव देशमुख आहेत. या दोन्ही संस्थेच्या वतीने श्री.राजेश दिनकराव देशमुख यांनी निविदेत भाग घेतला. तिसरी संस्था रेणुका बहुउद्देशिय संस्था पातुर यांची निविदा होती. सर्वात कमी दराची निविदा दिवंगत बनाबाई ओंकार अवचार उद्देशिय शिक्षण संस्था, आसोला, अकोला यांची होती.

3) नोंदवही नुसार विविध विभागातून 277 प्रशिक्षाणाथी हजर असल्याचे नमुद आहे. परंतु नोंदवहीमध्ये दिनांक नोंद नाही. ज्या उद्देशाकरिता अनुदान दिले त्या तज्ञ व्याख्यातावर खर्च झाला नसुन केवळ अनावश्यक बाबीवर ज्यास्त खर्च केल्याचे संस्थेने सादर केलेल्या देयकावरुन निदर्शनास आले.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणाच्या किटमध्ये वाचन साहित्य, लेटरपॅड, पेन, फोल्डर व अभिप्राय नोंदविणे याकरिता प्रपत्राचे वाटप करणे आवश्यक असतांना तसे वाटप केले नसल्याचे निदर्शनास आले. प्रदानापुर्वी संस्थेने सादर केलेल्या खर्चाची देयकाची तपासणी नोंदवहया सोबत तपासून देयकामध्ये वेगवेगळया बाबीवर संस्थेने दर्शविलेला खर्च बरोबर असल्याची संबंधीत शाखेकडून तपासणी न करताच संबंधीत शाखेकडून प्रदानांबाबत मंजुरी प्रदान केली आहे. सदर प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणासाठी किट्स वाटप मिळाल्याची पोच नसल्यामुळे वा नोंदवहीवर मिळाल्याची प्रशिक्षाणार्थीची स्वाक्षरी नसल्यामुळे प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणाच्या किटवर खर्च कल्याचे दर्शवून रुपये 21,500/- चे खर्च केल्यामुळे सदर रक्कम वसुल पात्र आहे.

5) वित्त विभाग, अधिसुचना क्रमांक 14/2015-ST, दिनांक 19/02/2015 नुसार सेवा पुरविणा-या पुरवठादाराकडून 14 टक्के सेवा कर रुपये 16,254/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केली नाही. त्यामुळे शासन निधी रुपये 16,354/- चे नुकसान झाले आहे.

6) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार सभागृह उपलब्ध नसल्यास भाडयाने घेणे बाबत सुचित असतांना सभागृह उपलब्ध नसल्याबाबत कोणताही पुरावा जोडला नाही. त्यामुळे सभागृहावर विनाकरण रुपये 52,675/- खर्च झाला. त्यामुळे सदर खर्च मान्य करता येणार नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए-2013/प्र.क्र.76/परा-1, दिनांक 24/01/2014 अंगणवाडीतील सेवीका व मदनीस / पर्यावेक्षिका यांना विधी तज्ञ व्यख्याता, अनुभवी व संवेदनशिल तज्ञ यांचेमार्फत प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक असतांना स्वंयसेवी संस्थेला सदरच्या कार्यक्रमाचे कंत्राट दिले. सदर संस्थेने सादर केलेल्या अभिलेख्यासोबत, मनुष्यबळ व तज्ञ व्यक्ती असल्याबाबत कोणताही लेखी पुरावा संस्थेने सादर केला नाही. प्रशिक्षण तज्ञ व्यक्तीमार्फत झाले असल्याबाबत खात्री होत नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश पुर्णपणे सफल झाला असे म्हणता येणार नाही.

8) सदर प्रशिक्षणाला स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्यांना आमंत्रित करणे आवश्यक असतांना त्याकरिता कोणत्या सदस्याला आमंत्रित केले याचा उल्लेख आढळला नाही. नोंदवहीमध्ये फक्त संबंधीताचे नावे नोंदविले आहेत.

9) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार प्रशिक्षणाचे प्रशिक्षणानिहाय फोटो काढणे आवश्यक असतांना मोघम स्वरुपात प्रशिक्षणार्थीचे फोटो सादर केले.

10) तज्ञाचे दरोरोज वेगवेगळया विषयावर पाच तास व्यारव्याने घेणे आवश्यक असतांना तासीके प्रमाणे नोंदवही नाही, तासीके प्रमाणे व्याख्यात्याचे फोटो नाहीत.

11) किशोरवयीन मुली व महिला तसेच अंगणवाडी सेवीकेचे व मदतनीस यांना दोन्ही प्रशिक्षणाचे एकत्रीत प्रशिक्षण दिल्याची शक्यता आहे. कारण दोन्ही प्रशिक्षण एकाच कालावधीत आयोजन केले त्याचप्रमाणे फोटो मध्ये दोन्ही प्रशिक्षणाचे फोटो एकत्र आहे.

12) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचना पत्र क्रमांक एबाविसेयो/जिप/172/2016, दिनांक 09/03/2016 नुसार प्रशिक्षाणार्थीला प्रशिक्षणाच्या किटमध्ये अभिप्राय नोंदविणे याकरिता प्रपत्राचे वाटप करावयाचे होते. तसे प्रपत्र नस्तीत आढळले नाही.

**4.483 सौर कंदील वाटप योजना राबविण्यातील अनियमिता.**

**पंचायत समिती मानोरा, जिल्हा वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.49/33, दिनांक 17/01/2001 मध्ये नमुद वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही. तसेच व्यापक प्रमाणावर योजनेची प्रसिध्दी केली नाही. त्यामुळे 423 नग सौर कंदील 75 टक्के अनुदानावर महिला लाभार्थ्यांना वाटप करावयाचे असतांना वित्तीय वर्ष 2015-2016 अखेर केवळ 227 लाभार्थीचे अर्ज प्राप्त होवुन लेखापरिक्षणाचे दिवशी 189 सौर कंदील शिल्लक राहुन योजना राबविण्याचा उद्देश सफल झाला नाही. व जिल्हा परिषदेची स्वनिधी रक्कम रुपये 2,22,937/- विनाकारण गुंतून राहुन इतर योजना राबविण्याकरीता स्वनिधी उपलब्ध झाला नाही.

2) लाभार्थीचे अर्ज तपासणी अंती 227 अर्ज प्राप्त झाले असुन त्याअनुषंगाने रुपये 89,211/- रक्कम बँकेत भरणा केल्याबाबत चलान प्रत उपलब्ध होणे आवश्यक होते. परंतु केवळ रुपये 78,993/- रक्कम भरणा केल्याबाबत 9 चलानप्रती उपलब्ध झाल्यात गठ्ठा क्रमांक 6 मधील लाभार्थी शोभा नामदेव खंडारे ते शोभा भिमराव कांबळे 26 लाभार्थ्यांचा 25 टक्के हिस्सा रुपये 393/- प्रमाणे रुपये 10,218/- बँकेत भरणा केल्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 4 दिनांक 17/09/2016 नुसार मागणी करुन सुध्दा रुपये 10,218/- ची चलान उपलब्ध झाली नाही. लाभार्थी हिस्सा भरणा न करता 26 लाभार्थ्यांना सौर कंदीलाचा दिलेला लाभ रुपये 1,572.75 प्रमाणे रुपये 40,892/- चौकशीअंती जबाबदारी निश्चित करुन वसुल करुन स्वनिधीत भरणा करणे आवश्यक ठरते.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस/2014/प्र.क्र.825/भागIII/ उदयोग, दिनांक 30/10/2015 च्या खरेदी नियमानुसार रुपये 3,00,000/- पेक्षा जादा रकमेची खरेदी असल्यास ई-

निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक आहे. वरील खरेदी नियमात नमुद तरतुदीनुसार सौर कंदील खरेदीबाबत उचित कार्यवाही केली नाही.

4) साठा पंजीत नमुद लाभार्थ्यांच्या यादीनुसार 423 सौर कंदील दिनांक 08/03/2016 रोजी प्राप्त झाले असुन दिनांक 05/04/2016 पासुन 230 लाभार्थ्यांना दिनांक 13/04/2016 पर्यंत वाटप केले व 189 सौर कंदील शिल्लक आहेत. प्राप्त 423 (-) वाटप 230 बरोबर 193 सौरकंदीला ऐवजी 189 सौरकंदील शिल्लक असल्याचे नमुद आहे. 4 सौर कंदीलाबाबत ताळमेळ जुळवुन दाखवावा अन्यथा 4 सौर कंदील x रुपये 1,572.75= 6,291/- ची चौकशी व जबाबदारी निश्चिती अंती वसुली करुन भरणा करुन अनुपालन सादर करावे.

5) साठा पंजीवर सौर कंदील वापराबाबत पडताळणी केली असता 230 लाभार्थ्यांपैकी 125 लाभार्थीचे आंगठे दोन साक्षीदारांनी स्वाक्षांकित केले नाही. तर अनुक्रमांक 11 ते 69 लागोपाठ आंगठे अनुक्रमांक 96 ते 123 लागोपाठ स्वाक्षऱ्या असल्याचे दिसुन आले. सदरबाब ग्राहय धरता येत नसुन मोघम स्वरुपात सौर कंदीलाचे वाटप केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार तांत्रिक गुणवत्तेबाबत तपासणी अहवाल नस्तीत आढळुन आला नाही. अटीची पुर्तता झाली नसतांना देयकाचे प्रदान कशाचे आधारे करण्यात आले अवगत झाले नाही.

**4.484 90 टक्के अनुदानावर मागासवर्गीय आर्थिकदुष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना शिवण यंत्रे पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25)** - पंचायत समिती कंळब येथील सन 2015-2016 चे लेखापरिक्षण केले असता 20 टक्के समाज कल्याण पिको फॉल शिलाई मशिन खरेदी करीता दैनिक मार्मिक दिनांक 08/03/2016 रोजी जाहिरात देण्यात आली व 14 दिवसाचे आत निविदा मागविण्यात आल्या प्राप्त निविदा पैकी लक्ष्मी ब्रँड मशीन खरेदी करिता कविश ट्रेडीग कंपनी यांची रुपये 7,200/- प्रती नगची निविदा मंजुर करुन जावक क्रमांक पंसक/पंचा/892/16, दिनांक 28/03/2016 नुसार पुरवठा आदेश देवून पिको फॉल शिलाई मशिन खरेदीवर प्रमाणक क्रमांक 8, दिनांक 31/03/2016 अन्वये 1,58,400/- खर्च नोंदविण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस 2014/प्र.क्र.83/उद्योग 4, दिनांक 30/10/2015, 02/01/1992 नुसार दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या नाही.

2) देयकातुन आयकर अधिनिमय 1961 चे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर कपात करण्यात आला नाही.

3) चलान क्रमांक Q, दिनांक 30/03/2016 नुसार लाभार्थीचा रुपये 720/- प्रमाणे लाभार्थी हिस्सा रुपये 15,840/- भरणा करण्यात आला. परंतु सोबत लाभार्थी निवड यादी जोडली नाही. त्यामुळे कोणकोणत्या लाभार्थीकडुन लाभार्थी हिस्सा वसुल करण्यात आला याबाबत तपासणी करता आली नाही.

4) लाभार्थी अर्ज आवक केले नाही. त्यामुळे अर्ज कोणत्या दिनांकास प्राप्त झाले याबाबत तपासणी करता आली नाही.

5) साठा रजिस्टर पान क्रमांक 15 वर नोंद घेण्यात आली असुन लाभार्थीचे नावासह वाटप नोदविला नाही. लाभार्थी अर्जानुसार लेखापरिक्षण दिनांकापर्यंत आठ लाभार्थीना शिलाई मशिन वाटप करण्यात आली असुन 14 नग शिलाई मशिन शिल्लक आहे.

6) बील नंबर 006, दिनांक 30/03/2016 नुसार कविश ट्रेडिग कंपनी कडुन 22 नग पिको फॉल मशिन खरेदी केले असताना डीएमवर कविश ट्रेडिग कंपनी यांचा रबर स्टॅम्प / शिक्का नसुन जय जगदीश सेल्स अकोला यांचा रबर स्टॅम्प / शिक्कक आहे. सप्रमाण खुलासा करावा.

8) साहित्याचे गुणावत्तेबाबत शासकीय प्रयोग शाळेचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही. त्यामुळे साहित्य योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

**4.485 SC/ST/NT महिला लाभार्थींना 90 टक्के अनुदानावर शिवणयंत्र वाटपाबाबत अनियमितता.**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8)** - सदरबाबत रक्कम रुपये 1,87,852/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने 90 टक्के व 75 टक्के अनुदान या दोन्ही योजने अंतर्गत एकुण रक्कम रुपये 3,35,857/- चे शिवणयंत्र खरेदी केले. महाराष्ट्र शासन, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 नुसार रुपये 3.00 लाखापेक्षा अधिक किमतीचे साहित्य खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियाचा अवलंब करावा असे निर्देश दिले असताना पंचायत समितीने ई-निविदा प्रक्रिया न राबविता खरेदी करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर 1633/57, दिनांक 19/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल करूनच योजना राबविणे आवश्यक असताना सन 2015-2016 या वित्तीय वर्षात लाभार्थी हिस्सा प्राप्त करण्यात आला नाही. त्यामुळे लेखापरीक्षण कालावधी दिनांक 06/08/2016 पर्यंत 9 नग शिवणयंत्र साठा पुस्तिकेत शिल्लक आहे.

3) 15 लाभार्थ्यांचे अर्ज 2016-2017 या आर्थिक वर्षात प्राप्त झाले असतांना सुध्दा त्यांना 2015-2016 मध्ये लाभ देण्यात आला.

योजना कार्यान्वित करण्यापुर्वी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभांच्या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे राबविण्याबाबत वेळापत्रक ठरवून दिले असून त्यानुसार कार्यवाही न करता अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार रक्कम खर्ची दर्शविण्यासाठी सन 2015-2016 मध्ये फक्त साहित्य खरेदी करण्यात आले आहे. लाभांर्थ्यांना अर्ज मार्च 2015 नंतर प्राप्त झाले व साहित्याचा लाभ हा मार्च 2015 नंतर देण्यात आला आहे. यामुळे ही संपूर्ण योजना सन 2015-2016 मध्ये राबविण्यात आली नाही. खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

4) प्रशासकीय मंजूरी आदेश व तांत्रिक मंजूरी आदेशावर क्रमांक व दिनांक नमुद नाही. त्यामुळे विहीत कालावधीत मान्यता, पुरवठा व वाटप झाल्याचे दिसून येत नाही.

5) पुरवठा आदेश दिनांक 05/03/2016 ला देण्यात आला व साहित्य दिनांक 30/03/2016 ला (साठा पुस्तकानुसार) प्राप्त झाले. साहित्् 10 दिवस उशिराने पोहचले करारनामा मुद्दा क्रमांक 8 नुसार पुरवठादारा कडून दंड रक्कम रुपये 8,250/- वसुल करण्यात आले नाही. वसुलपात्र रक्कम 8,250/-

6) दैनिक ध्वनीलहरी व साप्ताहिक साहसीक वर्धामध्ये जाहिरात दिल्याचे टिपणी मध्ये नमुद आहे. परंतु सदर वर्तमानपत्राची प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही. त्यामुळे जाहिरात दिल्याबाबत लेखापरीक्षणास शहानिशा होत नाही.

7) पंचायत समिती सभेने मंजुर केलेली लाभार्थी यादी लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही. त्यामुळे निवड प्रक्रिया न राबविता योजना राबविण्यात आल्याचे दिसुन येते.

8) डिलिव्हरी मेमो लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

9) उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

10) पंचायत समितीने गावनिहाय व योजनेनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नाही.

11) शिवणयंत्रामुळे किती लाभार्थ्यांच्या आर्थिक उन्नतीत फायदा झाला याबाबत योजनेचा फलश्रुती अहवाल घेणे आवश्यक असताना घेण्यात आला नाही.

**4.486 90 टक्के अनुदानावर मुलींना लेडीजसायकल पुरविणे कामातील अनियमीतता.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,98,450/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदीची किंमत रुपये 5,000/- पेक्षा अधिक असेल तेंव्हा निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे. पंचायत समितीने सायकल खरेदी करीता

समाजकल्याण विभागाने सायकल खरेदी करीता निवडलेले पुरवठाधारकांची निवड करण्यात आली. लेखापरीक्षणास सादर केलेले अभिलेखेनुसार समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेत सायकलचा पुरवठा जिल्हातील सर्व पंचायत समितीस करावयाचा होता. तथापि समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे ई-निविदेसाठी पंचायत समितीची मागणी समाविष्ट करणेबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. सदर मागणीचा जिल्हा परिषदेसाठी आवश्यक असणाऱ्या सायकल पुरवठामध्ये समावेश करणेस आला असता तर जादा मागणी असल्याने कमी दराचा फायदा जिल्हा परिषदेस झाला असता.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-3008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 तसेच शासन निर्णय दिनांक 17/01/2001 अन्वये जिल्हापरिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना सदर वेळापत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1084/सीआर-16357, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवड यादी जाहीर करु नये, असे असताना सर्व लाभार्थींकडून लाभार्थी हिस्सा वसुल न करताच पुरवठा आदेश देण्यात आला. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- मागास 1089/प्र.क्र.565/34, दिनांक 5/10/1989 तथा दिनांक 2/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु ती लेखापरिक्षणाकरिता सादर करण्यात न आल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर साहित्य लाभार्थींस प्राप्त झाल्याचे व ते त्याचा उपयोग करीत असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र/ मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आले नाही. त्यामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/646/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन केल्याचे दिसून येते नाही.

5) लेखापरीक्षण कालावधीपर्यंत एकुण 54 नग सायकलीपैकी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 37 सायकल वाटप केलेले असुन 27 सायकलीचे वाटप करण्यात आलेले नाही. सदर योजनेकरीता लाभार्थींची निवड सन 2015-2016 सत्रातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहेत. साहित्य विहीत कालावधीत वाटप केले नसल्याने 10 वीत शिकणारे विदयार्थ्यांना सदर योजनेचा लाभ होऊ शकलेला नाही.

6) लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले लाभार्थी अर्जापैकी काही निवडक अर्जाची तपासणी केली असता काही अर्जामध्ये त्रुटी आढळुन आलेले आहेत. सदर लाभार्थींचे अर्जातील कागदपत्रानुसार उत्पन्नाचा दाखला, शाळेत शिकत असल्याबाबत दाखला सन 2016-2017 कालावधीचे असताना सदर लाभार्थींची निवड सन 2015-2016 चे योजनेत करण्यात आली आहे.

7) देयकातुन 2 टक्के आयकर रुपये 3,690/- कपात करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करण्यात आलेले नाही.

**4.487 50 टक्के अनुदानावर कापड शिलाई मशिनचा पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती अर्जूनी मोरगांव, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,17,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा धारक यांचे कडून प्राप्त होणारी दरपत्रके सिलबंद लिफापा मध्ये असून त्यावर कार्यालयाचे आवक क्रमांक नमूद करण्यात आलेले नाही.

2) पुरवठा धारक श्री. शीवम स्टोर्स देसाईगंज वडसा यांना कार्यालयीन पत्र क्रमांक पंसअ/पंचा/वि.अ/डे-23/ 958, दिनांक 04/03/2016 अन्वये 30 नगाचे असून (सर्व सुटया साहीत्य सह) नमूद आहे. मात्र पुरवठा धारक यांचे बिजका मध्ये सुटे साहित्य नमूद नाही. तसेच साहित्याचे डिलीव्हरी मेमो लेखा परीक्षणामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे मशिन सोबत मायका टॉप, कैची, साईड गार्ड, टेप, स्क्रू ड्रायव्हर असे सुटे साहित्य प्राप्त झाले किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणामध्ये खातरजमा करुन घेता आली नाही.

3) पुरवठा धारक यांचे बिजका मध्ये मशिनचे चेचिस क्रमांक नमुद नसल्याने तसेच डिलीव्हरी मेमो प्राप्त नसल्याने साठा पुस्तिका क्रमांक 33 चे पान क्रमांक 8 वर नोंद घेण्यात आली आहे कि, मशिन क्रमांक 12739 ते

12768 बाबत लेखापरीक्षणामध्ये खातरजमा करुन घेता आली नाही. तेव्हा दस्ताऐवजासह खातरजमा होणे आवश्यक आहे.

4) लाभार्थी यांची यादी नस्तीला असुन त्यावर पंचायत समिती सभापती व खंडविकास अधिकारी यांची त्यावर स्वाक्षरी नाही.

5) सदर साहित्य हे भारतीय मानकाप्रमाणे असल्याबाबत तपासणी अहवाल नस्तीला नाही.

6) तपासणी अहवाल प्राप्त होण्यापुर्वीच रक्कमेचे प्रदान करणे.

7) आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या महिलांना स्वयंम रोजगार करीता साधन उपलब्ध व्हावे. याकरीता योजना असून योजने करीता निवड केलेल्या लाभांर्थीचे अर्जाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले कि, शाळेमध्ये शिकणा-या विदयार्थीनी कु. दिपाली महादेव मेश्राम, रा.चिचोली जन्म दिनांक 05/05/2002 असून वर्ग 8 मध्ये शिकणा-या मुलींना सुध्दा योजनेचा लाभ दिलेला आहे. सदर विदर्थीनी ही लाभाकरीता पात्र नसल्याने दिलेला लाभ हा आक्षेपार्थ असल्याने लाभार्थी हिस्सा वगळता पंचायत समिती सेस फंडाची रक्क्म रुपये 1,950/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या शीर्षामध्ये जमा होणे आवश्यक आहे.

**4.488 ग्रामीण भागातील मुलींना भरतीपुर्व पोलीस प्रशिक्षण शिबीर आयोजनातील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती गोंडपिंपरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला व बालविकास विभागातर्फे ग्रामीण भागातील मुलींकरीता भरतीपूर्व पोलीस प्रशिक्षण शिबीर दिनांक 17/02/2016 ते 07/03/2016 या कालावधीत एकुण 20 दिवस गोंडपिपरी येथे घेण्यात आले. त्यावर रुपये 1,00,000/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रशिक्षण शिबीर दिनांक 17/02/2016 ते 07/03/2016 या कालावधीत आयोजित केले होते. परंतु दिनांक 07/03/2016 ला शिबीरात शिबीरार्थीची उपस्थिती नसल्याचे उपस्थिती रजिस्टर वरुन दिसून येते.

2) श्री.किशोर राउत व श्री निलेश चुनारकर यांना प्रत्येकी 4,000/- रुपये व्याख्याते मानधन म्हणून दिल्याचे दिसून येते. परंतु त्यांना मानधन मिळाल्याची पोच नस्तीस नाही.

3) बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती गोंडपिपरी यांचे पत्र क्रमांक 39, दिनांक 05/02/2016 अन्वये लकी स्पोटर्स चंद्रपूर, आराधना स्पोटर्स चंद्रपूर व श्री स्पोटर्स चंद्रपूर अशा तीन पुरवठादारांकडून टि-शर्ट लोअर व शुज-सॉक्स खरेदी करीता दरपत्रके दिनांक 10/02/2016 पर्यंत मागितले. त्यानुसार प्राप्त दरपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता तयार करुन श्री स्पोटर्स चंद्रपूर यांचे दर सर्वात कमी असल्याचे दर्शवून पत्र क्रमांक 48, दिनांक 11/02/2016 अन्वये त्यांना पुरवठा आदेश दिला. परंतु नस्तीला फक्त श्री स्पोटर्स यांचे दरपत्रक लागले असून उर्वरीत दोन पुरवठादार आराधना स्पोटर्स चंद्रपूर व लकी स्पोटर्स चंद्रपूर यांचे दरपत्रक नस्तीला किंवा देयकाला लागलेले आढळून आले नाही. त्यामुळे श्री स्पोटर्स यांना दिलेला पुरवठा आदेश लेखापरीक्षणास ग्राहय धरता येणार नाही.

4) बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती गोंडपिपरी यांचे पत्र क्रमांक 39, दिनांक 05/02/2016 अन्वये पारस एन्टरप्रायझेस चंद्रपूर, ओम शांती प्रिंटर्स चंद्रपूर, पुजा स्टेशनरी अँड प्रिंटर्स चंद्रपूर यांचेकडून पुस्तक खरेदीसाठी दिनांक 10/02/2016 पर्यंत दरपत्रके मागविली. तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यात पारस एन्टरप्रायझेस चंद्रपूर यांचे दर सर्वात कमी दर्शवून पत्र क्रमांक 48, दिनांक 11/02/2016 अन्वये पुरवठा आदेश दिला परंतु उर्वरीत पुरवठादार ओम शांती प्रिंटर्स चंद्रपूर, पुजा स्टेशनरी अँड प्रिंटर्स चंद्रपूर यांचे दरपत्रक नस्तीला किंवा देयकाला लागलेले आढळून आले नाही. त्यामुळे पारस एन्टरप्रायझेस चंद्रपूर यांना दिलेला पुरवठा आदेश लेखापरीक्षणास ग्राहय धरता येणार नाही.

5) बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती गोंडपिपरी यांचे पत्र क्रमांक 39, दिनांक 05/02/2016 अन्वये कॉलेज बॅग खरेदीसाठी सोनी ट्रेडर्स चंद्रपूर, नॉव्हेल्टी बॅग सेंटर चंद्रपूर व गृहशोभा बॅग हाउस चंद्रपूर यांचेकडून बॅग खरेदीसाठी दिनांक 10/02/2016 पर्यंत दरपत्रके मागविली. त्यात तुलनात्मक दराचा तक्ता तयार करुन गृहशोभा बॅग हाउस चंद्रपूर यांचे दर सर्वात कमी दर्शवून पत्र क्रमांक 11/02/2016 अन्वये पुरवठा आदेश दिला

परंतु उर्वरीत दोन पुरवठादार यांचे दरपत्रक नस्तीला किंवा देयकाला लागलेले आढळून आले नाही. त्यामुळे गृहशोभा बॅग हाउस चंद्रपूर यांना दिलेला पुरवठा आदेश लेखापरीक्षणास ग्राहय धरता येणार नाही.

6) उपरोक्त अनुक्रमांक 3, 4 व 5 नुसार टि-शर्ट लोअर व शुज-सॉक्स खरेदी, पुस्तक खरेदी, व कॉलेज बॅग खरेदीसाठी वेगवेगळया पुरवठादारांकडून दरपत्रके मागविली आहेत. परंतु सदर तीनही साहित्याचे दरपत्रके मागविण्यासाठी पत्राचा जावक क्रमांक दिनांक एक सारखाच आहे. यावरुन सदर दरपत्रक मागविण्याची प्रक्रीया फक्त कागदोपत्री असल्याचे दिसून येते.

7) अनिल बिछायत केंद्र, गोंडपिपरी यांना गादी, चादर व दरी यांचे 2 दिवसांकरीता 5,000/- रुपयांचे प्रदान केले आहे. परंतु याकरीता इतर बिछायत केंद्राकडून दरपत्रके म्ारविली नाहीत. त्यामुळे बाजारभावाचा फायदा होऊ शकला नाही.

**4.489 पंचायत समिती सेसमधून महिला व बालविकास विभागाच्या लाभार्थ्यांसाठी शिलाई मशिन खरेदी मधील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत रक्कम रुपये 88821/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बालविकास सेवा योजना व समाजकल्याण विभागासाठी शिलाई मशिन खरेदी करण्यासाठी पंचायत समिती सेस मधूनच तरतुद करण्यात आली आणि रितसर मान्यता संवर्ग विकास अधिकाऱ्याने दिलेली आहे. पंचायत समीती स्तरावर याच वस्तुसाठी निवीदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात रुपये 4,500/- दर निश्चित करण्यात आले असताना एबविसेयो प्रकल्प सिंदेवाही यांनी ज्यादा दराने दुस-या फर्म म्हणजे रुपये 5,751/- इतक्या दराने आदेश देण्याचे प्रयोजन काय. वेगळ्याने आदेश दिल्यामुळे प्रती मशिन रूपये 1,251/- ज्यादा शोधन करावे लागले. म्हणजे 71 शिलाई मशिनसाठी रूपये 88,821/- ज्यादा शोधन झाले. त्यामुळे सदर ज्यादा शोधनाची जवाबदारी निश्चित करुन संबधीताकडून वसूल करावी.

2) लाभार्थी सहभागाची वसुली करण्यात आली किंवा कसे याबाबत दस्तावेज पहावयास मिळाले नाही.

3) एकात्किम बालविकास सेवा योजनेने खरेदी केलेल्या 71 शिलाई मशिन लाभार्थ्याला वाटप केले किंवा कसे याबाबत प्रस्ताव पहावयास मिळाले नाही.

4) बालकल्याण विभागासाठी खरेदी केलेल्या मशिनला प्रशासकीय मान्यता दिनांक 10/03/2016 ला प्राप्त झाली, परंतु लाभार्थी निवड दिनांक 26/02/2016 ला झाली. प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वी लाभार्थी निवड कशी करण्यात आली खुलासा व्हावा.

5) वस्तु प्राप्त झाल्याबाबत साठा रजिस्टर पहावयास मिळाले नाही.

6) पुरवठाधारकांना आदेश देण्यापुर्वी सुरक्षा राशी घेणे क्रम प्राप्त असतांना सुरक्षा ठेव घेतली नाही.

7) महिला बाल विभागाकडील शिलाई मशिन खरेदी बाबत नस्ती पहावयास मिळाली नाही.

**4.490 जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अंगणवाडी बांधकामांत आढळलेल्या अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 63,70,137/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. एकूण 19 विकास कामांचे प्रमाणके व इतर अभिलेखे तपासले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार रुपये 03.00 लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामाकरिता ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असतांना विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने ग्रामपंचायतींना कामे देण्यात आलेली आहेत.

2) अनुक्रमाक 01 व 02 कामांच्या मुळसंचिका, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर कामांच्या प्रशासकीय/तांत्रिक मान्यता, तसेच कामांचे मुल्यांकन वगैरे बाबत खात्री करता आली नाही.

3) शासन अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार उपरोक्त विकास कामांच्या देयकातून 5 टक्के कार्यकंत्राट कर वसुल केलेला नाही. तरी सदर कार्यकंत्राट कराची रक्कम रुपये 3,18,507/- संबंधीतांकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र. 837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त कामांचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 63,701/- संबंधितांकडून वसुल करुन विमा संचालनालय यांचेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) नुसार देयकातून 2 टक्के प्रमाणे आयकर वसुल करणे आवश्यक होते, परंतु सदर देयकातून आयकराच्या रकमा वसुल केलेल्या नाहीत. तरी आयकराची रक्कम रुपये 1,27,403/- संबंधीताकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.109/रा.म.2, दिनांक 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. तथापि कामावरील साहित्याचे चाचणी अहवाल देयकासोबत संलग्न केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. चाचणी अहवाला अभावी अंतीम अदाई करणे अनियमित आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक ठळकपणे दिसतील असे लावणे आवश्यक असतांना अशी कारवाई केलेली दिसून येत नाही.

8) तीन कामासंदर्भातील संचिका मोजमाप पुस्तिका, प्रशासकिय मान्यता, तांत्रिक मान्यता करारनामा, कामाचे आदेश इत्यादीची वारंवार मागणी करुनही अभिलेखे लेखापरिक्षणास दर्शविले नाही. त्यामुळे सदरील कामावर अनुक्रमे रुपये 4,61,139/-, 3,38,979/- व रुपये 6,00,000/- केलेला खर्च लेखापरिक्षणात पडताळणी करुन त्यावर अभिप्राय देता आलेला नाही.

9) उपरोक्त कामासंबंधी ग्रामपंचायतीकडून बी-1 निविदा फॉर्म भरून घेण्यात आलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी 09/05/प्र.क्र.381/इमारती-02, दिनांक 12/11/2007 नुसार प्रति निविदा फॉर्म फी रुपये 500/- प्रमाणे रुपये 9,500/- चे पंचायत समितीचे नुकसान झाले आहे तरी संबंधीताकडून बी-1 निविदा फॉर्म शुल्क वसुल करून पंचायत समिती उपकरात भरणा करणे आवश्यक आहे.

**4.491 पंचायत समिती उपकरातून महिला व बालकल्याण अंतर्गत साहित्य खरेदीबाबत.**

**पंचायत समिती जाफ्राबाद, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 9, माहे मार्च, 2016 अन्वये रक्कम रुपये 2,23,947/- खर्च करण्यात आला आहे.

अ) प्रमाणक क्रमांक 27 माहे मार्च, 2015 अन्वये ग्रामीण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर समाजप्रबोधन साहित्य संच वाटप करणेसाठी एकूण 18 संच प्रति दर रुपये 26,845/- प्रमाणे रुपये 4,83,210/- पैकी 90 टक्के अनुदानाची रक्कम रुपये 4,34,889/- तसेच 10 टक्के लोकवर्गणी रक्कम रुपये 48,321/- लाभधारकांना समाजप्रबोधन साहित्य संच पुर्ण वाटप झाल्यावर पुरवठाधारकास अदा करण्याबाबत नमुद आहे.

ब) प्रमाणक क्रमांक 69 माहे मार्च, 2015 ग्रामीण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर समाजप्रबोधन साहित्य संच वाटप करण्यासाठी वाढीव मागणी असल्यामुळे पंचायत समिती सर्वसाधारण ठराव क्रमांक 107, दिनांक 13/03/2015 अन्वये पुर्नप्रत्यथी आदेश देण्यात आले आहेत. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/1088/(2515) उद्योग 06, दिनांक 02/01/1992 मधील (बाब 8.5) नुसार दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र व पुरवठादार अधिकृत डिलरशीप प्रमाणपत्र संचिकेत दिसुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट (ई) नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना विहीत वेळापत्रकाचे पालन केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक परास-1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थी निवड ही साहित्य खरेदी करणेपुर्वी करणे आवश्यक असतांना अशाप्रकारे शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही केल्याचे संचिकेवरुन दिसुन आले नाही.

4) दुबार खरेदी करण्यासाठी पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 107, दिनांक 13/03/2015 अन्वये प्रस्तुत कार्यालयाने 17 सामुहिक महिला व बालकल्याण योजनेतंर्गत समाजप्रबोधन साहित्य खरेदी केले आहे. परंतु तालुक्यातून वाढती मागणी असल्यामुळे व अर्ज व प्रस्ताव सादर केले असल्याचे नमुद आहे. परंतु याबाबत संदर्भिय मागणी व अर्ज प्रस्ताव लेखापरिक्षणात संचिकेत दिसुन आले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर 1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा 10 टक्के प्रथम वसुल करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.34, दिनांक 01/09/1993 अन्वये योजना ज्यावर्षात राबविली त्याच वर्षात साहित्य वाटप केलेले नाही.

7) साहित्य प्राप्त झालेबाबतचे डिलेव्हरी चलन तसेच साहित्याची साठा नोंदवहीत नोंद घेवून साहित्याचा विनियोग दर्शविण्यात आलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/प्र.क्र.55, दिनांक 10/05/1989 व दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

9) दरपत्रकासोबत बयाना रक्कम रुपये 5,000/- चा डिमांड ड्राफ्ट पंचायत समितीने डिपॉझीट खात्यात जमा न करता संचिकेमध्ये तसाच ठेवला आहे.

**4.492 महिला व बाल कल्याण अंतर्गत 90 टक्के अनुदानावर पिठाची गिरणी पूरवठा करणे बाबत.**

**पंचायत समिती कळमनुरी, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,86,400/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयूक्त अधिसूचना क्रमांक विसआ(मूख्या)/मूवक/2005/97, दिनांक 29/08/2005 प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून देय रक्कमेच्या 2 टक्के रक्कम विक्रीकर रूपये 17,272/- कपात केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पं.रा.1, दिनांक 24/01/2014 नुसार एकूण निधीपैकी 50 टक्के निधी गट अ तर 50 टक्के निधी गट ब योजनांवर न राबविता संपूर्ण निधी गट ब वर खर्च करण्यात आला आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड रुपरेषा लाभार्थी निवड 30 जुन पर्यंत करुन खरेदी नोव्हेंबर मध्ये करुन साहीत्याचे वाटप जानेवारी पर्यंत करावयाचे आहे. शासनाच्या निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास.1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी निविदा बोलवण्यापुर्वी खरेदी

करण्यापुर्वी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत लाभार्थीची निवड करावयास पाहिजे. परंतु लाभार्थीची निवड केलेली नाही. तसेच ठराव पूस्तक लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाही.

6) नग 05 शिल्लक असून याचा कोणत्याही लाभार्थीस लाभ झालेला नाही व प्रति नग रूपये 16,933/- प्रमाणे 05 नगाचे रूपये 84,665/- निधी गूंतून पडला आहे. तरी याबाबत रक्कम रूपये 84,665/- ची वसूली होणे आवश्यक आहे.

7) लाभार्थीचे अर्ज तपासले त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या

अ. विज कोटेशन घेतले असल्याचे प्रमाणीत केलेले नाही.

ब. योजनेचा यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक यांनी दिले असून ते प्रमाणीत नाही.

क. लाभार्थी उत्पन्नाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी ऐवजी तलाठी यांचे आहे.

ड. लाभार्थी अर्ज अपूर्ण असून साक्षांकीत केलेले नाहीत.

8) साठा नोंदवहीत डीलेव्हरी चालानची नोंद नाही. त्यामूळे वस्तूचा साठा नेमका कधी प्राप्त झाला याची खात्री करता येत नाही. साठा नोंदवहीवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामूळे दूबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) निवीदा प्रक्रीया कोणत्या दिनांका पासून कोणत्या दिनांकापर्यत राबविण्यात आली. याचा तपशिल संचीकेवरून आढळून येत नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी 1083/सीआर/1074/57 दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा मूळ हेतू सफल होत आहे किंवा नाही. याबाबत योग्य ती सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही. त्यामूळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/ पं.रा.1, दिनांक 24/01/2014 नूसार 3 टक्के अपंग महिलासांठी योजनेचा निधी खर्च करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. सदर अनूशेष तात्काळ भरूण काढण्यात यावा.

12) लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 78,640/- पूरवठा धारकास प्रदानाची पोच नाही.

### 4.493 महिला व बालकल्याण अंतर्गत 90 टक्के अनुदानावर सौर कंदिल पूरवठा करणे बाबत.

**पंचायत समिती वसमत, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,98,960/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पं.रा.-1, दिनांक 24/01/2014 नूसार एकूण निधीपैकी 50 टक्के निधी गट-अ तर 50 टक्के निधी गट-ब योजनांवर न राबविता संपूर्ण निधी गट-ब वर खर्च करण्यात आला आहे. तरी याबाबत शासनाचे क्षमापण आवश्यक आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.872/2ब, दिनांक 10/10/1996 नूसार पंचायत समितीने कोणतीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी किती वस्तूची आवश्यकता आहे. याचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड रुपरेषा लाभार्थी निवड 30 जुन पर्यंत करुन खरेदी नोव्हेंबर मध्ये करुन साहीत्याचे वाटप जानेवारी पर्यंत करावयाचे आहे. परंतु सदरील योजनेमध्ये खरेदीचे आदेश ऑगस्ट 2014 मध्ये देऊन साहित्याचे वाटप माहे ऑगस्ट 2014 नंतर केले आहे. शासनाच्या निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास.1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी या साठी निविदा बोलावण्यापुर्वी खरेदी करण्यापुर्वी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत लाभार्थीची निवड करावयास पाहिजे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

6) नग 12 शिल्लक असून याचा कोणत्याही लाभार्थीस लाभ झालेला नाही व प्रति नग रूपये 3,300/- प्रमाणे 12 नगाचे रूपये 39,600/- निधी गूंतून पडला आहे. तरी याबाबत रक्कम रूपये 39,600/- ची वसूली होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95, दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे वस्तुची / साहित्याची खरेदीपूर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रीया निकषानुसार परिपूर्ण होईल याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच परिच्छेद क्रमांक 5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक होते. साहित्याचे वाटप यथावकाश करणे ही वित्तीय अनियमितताच आहे. वित्तीय वर्ष अखेरही साहित्य विनावाटप पडून असल्याने रक्कम विनाकारण गुंतून पडलेली आहे.

7) साठा नोंदवहीवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही प्रमाणीत ठेवलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा मूळ हेतू सफल होत आहे किंवा नाही याबाबत योग्य ती सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही. त्यामूळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पं.रा.-1, दिनांक 24/01/2014 नूसार 3 टक्के अपंग महिलासांठी योजनेचा निधी खर्च करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. सदर अनूशेष तात्काळ भरूण काढण्यात यावा.

**4.494 महिला व बालकल्याण विभागाचे तालुका स्तरावरील साहित्य वाटप न झालेबाबत.**

**पंचायत समिती हदगांव, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती हदगावचे सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणास अद्याप पावेतो साहित्य वाटप करण्यात आलेले नाही. सदर बाबत रक्कम रूपये 1,09,160/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर योजना 10 टक्के लाभार्थी हिस्सा व 90 टक्के अनुदानावर राबवलेली असल्यामुळे प्रथम लाभार्थी हिस्सा रक्कम वसुल करुन साहित्य खरेदी केले असते तर साहित्य त्याच वेळी वाटप झाले असते. त्यामुळे ओ.टी.एस.पी व एस.सी.पी योजनेतुन खरेदी केलेल्या पिठाची गिरणी व शिलाई मशिन यांची रक्कम रुपये 1,09,160/- निरर्थक गुंतुन पडलेली आहे. या बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**4.495 पंचायत समिती स्वतःच्या उत्पन्नातून 10 टक्के रक्कम महिला व बालकल्याणार्थ खर्च न केल्याबाबत.**

**पंचायत समिती मुखेड, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती मुखेड सन 2015-2016 या वित्तीय वर्षात स्वतःच्या उपकर निधी मधुन किमान 10 टक्के रक्कम महिला व बालकल्याणार्थ खर्च केलेली नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2001/10/प्र.क्र.05/208, दिनांक 06/11/2001 नुसार पंचायत समितीने स्वतःच्या उत्पन्नातून 10 टक्के रक्कम महिला व बालकल्याणार्थ खर्च करणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समितीने काही खर्च केले नाही.

**4.496 90 टक्के अनुदानावर पंचायत समिती स्वनिधी अंतर्गत शिलाई मशिन खरेदी व वाटपाबाबत.**

**पंचायत समिती तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 6, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 2,90,952/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय भाखसं-2014/प्र.क्र.82/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार प्राप्त निवीदाधारकाशी दराबाबत वाटाघाटी करता येत नाहीत. तथापि पंचायत समितीने वाटाघाटीने नियमबाह्यपणे निवीदा अंतीम केल्या आहेत.

2) पंचायत समितीने खरेदी केलेल्या 72 शिलाई मशीन पैकी 01 शिलाई मशीन वाटपाविना शिल्लक आहे.

3) कदम मनिषा शशिकांत रा.कात्री व महादेवी दिलीप स्वामी रा.सावरगाव यांचे शिलाई मशीन मागणी अर्ज नसताना वाटप केलेले आहे. अनूचीत लाभाची रक्कम रु.8080/- वसुल करणे आवश्यक आहे.

4) शिलाई मशीन वाटप केलेल्या पाच लाभार्थ्यांचा लोकवाटा रक्कम 2250/- लेखापरीक्षण दिनांकापावेतो पंचायत समितीकडे जमा केलेला नाही.

5) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची गावनिहाय सनियंत्रण नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि अशी नोंदवही ठेवलेली नाही.

6) ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक दिनांक 29/07/1983 नुसार लाभार्थीकडुन दिलेले लाभाबाबत करारनामे करुन घेणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

**4.497 अंगणवाडी बांधकामे अपूर्णकामांमुळे शासन निधीचे नुकसान झालेबाबत.**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती कळंब, येथे अंगणवाडीची 39 बांधकामे अपूर्ण असल्याने व काम सुरु न केल्यामुळे केलेला खर्च रक्कम रुपये 1,65,50,000/- निष्फळ ठरला आहे.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 (2) (ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामे रद्द केल्याने त्या कामावर सन 2010-11, 2011-12, 2012-13, 2013-14 मध्ये वितरीत केलेला निधी निष्फळ ठरला असुन, काम अपुर्ण राहुन त्यानंतर रद्द केल्यामुळे शासन निधीचे नुकसान झालेले आहे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चीत साहिलेला निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. उपरोक्त कामे रद्द केल्यानंतर त्या कामासाठी वाटप केलेला निधी हा निष्फळ ठरल्याने संबंधीत ग्रामपंचायतीकडुन प्रदान केलेल्या रक्कमेची वसुली करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिच्छेद 2 जिल्हा परिषदांकडील हस्तांतरीत योजना (बांधकाम विभाग) योजनाबाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहीत करुन प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करावते. तथापि प्राप्त अनुदानातुन कामावर पुर्णत: खर्च न झाल्याने व काम पुर्ण न झाल्याने व कालांतराने रद्द केल्याने शासनाच्या योजनांचा जनतेस फायदा होऊ शकला नाही. तसेच काम पुर्ण न केल्यामुळे शासन निधीचे नुकसान झालेले आहे.

**4.498 पंचायत समिती उपकरातून 10 टक्के लोकवाट्यावर 18 महिला व बालकल्यानांतर्गत मिनी पिठाची गिरणी पुरवठाबाबत.**

**पंचायत समिती लातूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती उपकरातुन 18 महिला व बालकल्याणांतर्गत 10 टक्के लोकवाटयावर मिनी पिठाची गिरणी दिनांक 02/02/2016 च्या

ई-निविदेद्वारे खरेदी करण्यात आलेली आहे. सदर योजनासाठी तरतुद रुपये 9,00,000/- एवढी करुन त्यापोटी रुपये 8,97,900/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-2014/प्र.क्र.82/ भाग 3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये अ.क्र.11 नुसार प्रशासकीय आदेशात खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तुचा विनियोग तातडीने केला जाणार आहे. असे प्रमाणीत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही.

तसेच खरेदीच्या देयकाच्या रक्कमा 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येवु नयेत खरेदीदाराने आवश्यक त्या वस्तुची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पुर्वीच करणे आवश्यक आहे. तशी अमंलबजावणी झालेली नाही.

2) साठा नोंदवही नमुना नं.33 पृष्ठ क्र.34 वर साहित्याची नोंद घेण्यात आली आहे. परंतु वाटप लेखापरिक्षण दिनांकापर्यंत करण्यात आले नाही. यावरुन त्याच वित्तीय वर्षात लाभार्थीस लाभ मिळाला नसल्याचे दिसुन येते.

3) योजनेवरील लाभार्थींची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थींना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यापुर्वीही लाभ दिला गेला नाही. याबाबत पडताळणी करता आली नाहीत.

4) लाभार्थीकडुन विनियोग प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच सक्षम अधिका-यांची फलश्रृती अहवाल घेणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ZPA2009/प्र.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये मुंबई मुंद्राक अधिनियम 1958 च्या कलम 34 नुसार करारनामा करणे आवश्यक आहे. संबंधीत पुरवठादाराकडुन करारनामा रुपये 100/- मुद्रांक शुल्काचा केलेला नाही तो दर्शवावा. तसेच संबंधीताकडुन रक्कम रुपये 100/- वसुलात आणुन पुर्तता दर्शवावी.

6) लाभार्थींना लाभ देण्यापुर्वी प्रथमत: लोकवाटा वसुल करुनच लाभार्थींना साहित्याचे वाटप करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली नाही. सदरचा लोकवाटयाची रक्कम रुपये 89,790/- एवढी वसुलात आणुन पंचायत समिती उपकर निधीत भरणा करुन खात्री पटवावी.